K L THAKUR
AND SONS SARAF
Since 1928
Gold | Silver | Diamond
3209, Bagwanpur, Kamod Road, Nasik-422001
0253-2505488 | 2504258

नाशिक जिल्ह्यातील सर्वाधिक खपाचे पहिले सायंदैनिक
किंमत २
# भ्रमर
BHRAMAR

Physioflex
Working towards healthy lifestyle
Physiotherapy Clinic & Fitness Studio
Dr. Moinuddin Farooque (CEO physioflex)
PHYSIOTHERAPIST (M.S.PT.)
9021756646 8329099901
Physiofit Clinic, Shop Number 2, Jumma Masjid, Naikwadi Pura, Patil Gali, Old Nashik
Shivraya Multi Speciality Hospital, DGP Nagar 2, Ambad Link Rd., Near Mauli Lawns, Kamatwade, Nashik

वर्ष ५३ वे, अंक १११
Year : 53, Issue No. : 111
नाशिक, गुरुवार दि. ११ सप्टेंबर २०२५
Nashik, Thursday 11 September 2025
R.N.I. Regd. No.20904/72
Postal Reg. No. NSK/16/2024-2026
पाने ६, किंमत २ रुपये
Pages : 6, Price Rs. 2

## जादा नफ्याचे आमिष दाखवून एक कोटी रुपयांची फसवणूक

### शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यास भाग पाडत घातला गंडा

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :- शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास मोठ्या प्रमाणात नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून तिघा जणांनी तक्रारदार व साक्षीदाराची १ कोटी १५ लाख ३३ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की नाशिक येथे राहणारे फिर्यादी यांच्यासह इतर साक्षीदारांशी आरोपी रिया सेहगल, संजय कपूर व त्यांचे अनोळखी साथीदार यांनी दि. २४ जून ते २२ ऑगस्ट या कालावधीत वेळोवेळी संपर्क साधला. त्यानंतर आरोपींनी फिर्यादी व साक्षीदारांना शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करून मोठ्या प्रमाणात नफा कमावून देण्याचे आमिष दाखविले. त्यावर विश्वास ठेवून फिर्यादी व साक्षीदार यांनी अनुक्रमे ६१ लाख २३ हजार ५२९, १४ लाख ४० हजार, २९ लाख ९० हजार व १६ लाख ८० हजार अशी एकूण १ कोटी १५ लाख ३३ हजार ५२९ रुपयांची गुंतवणूक आरोपींनी सांगितलेल्या वेगवेगळ्या बँक खातेदारांच्या खात्यांवर ऑनलाईन पद्धतीने शेअर मार्केटमध्ये केली; मात्र इतक्या मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करूनही नफा होत नसल्याचे लक्षात आले. त्यानंतर फिर्यादींनी आरोपींशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; मात्र त्याला प्रतिसाद मिळाला नाही.

आपली फसवणूक झाल्याची बाब लक्षात आल्यानंतर फिर्यादी यांनी सायबर पोलीस ठाण्यात फसवणुकीची फिर्याद दिली असून, पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक पाटील करीत आहेत.

## ४ राज्यांमधून ५ संशयित दहशतवाद्यांना अटक

### स्फोटके बनवण्याचे साहित्य जप्त, सोशल मीडियाद्वारे पाकिस्तानी हँडलर्सच्या संपर्कात

**नवी दिल्ली (भ्रमर वृत्तसेवा) :- दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेल आणि केंद्रीय एजन्सींनी अनेक राज्यांमध्ये छापे टाकून इसीस मॉड्यूलचा पर्दाफाश करत ५ संशयित दहशतवाद्यांना अटक केली. संशयित दहशतवाद्यांकडून आयईडी बनवण्यासाठी वापरले जाणारे साहित्य देखील जप्त करण्यात आले आहे.**

पोलीस सूत्रांनी सांगितले की, ५ संशयितांपैकी दोन दिल्लीचे आणि मध्य प्रदेश, तेलंगणातील हैदराबाद आणि झारखंडमधील रांची येथील प्रत्येकी एक संशयित आहे. गटप्रमुख अशरफ दानिश याला रांची येथून आणि आफताब, सुफियान या दोघांना दिल्लीतून अटक करण्यात आली आहे.

अशरफ दानिश भारतातून दहशतवादी मॉड्यूल चालवत होता. रांची येथील त्याच्या लपण्याच्या ठिकाणावरून एक देशी बनावटीचे पिस्तूल, काडतुसे, हायड्रोक्लोरिक ॲसिड, नायट्रिक ॲसिड, सल्फर पावडर, तांब्याचे पत्रे, बॉल बेअरिंग्ज, स्ट्रिप वायर्स, इलेक्ट्रॉनिक सर्किट्स, लॅपटॉप, मोबाईल फोन आणि रोख रक्कम जप्त करण्यात आले आहे. आफताब आणि सुफियान हे मुंबईचे रहिवासी आहेत. स्पेशल सेलने मुंबईतील त्यांच्या लपण्याच्या ठिकाणांवरही छापे टाकले आहेत. तेथून शस्त्रे आणि आयईडी बनवण्याचे साहित्य देखील जप्त करण्यात आले आहे. सर्व संशयित दहशतवादी सोशल मीडिया अकाउंटद्वारे पाकिस्तानस्थित हँडलर्सच्या संपर्कात होते.

दिल्ली पोलिसांच्या सूत्रांनी सांगितले की, संशयित दहशतवादी भारतात मोठा दहशतवादी हल्ला करण्याची योजना आखत होते. त्यांनी सोशल मीडियाचा वापर करून भारतातील तरुणांना कट्टरतावादी बनवून त्यांच्या नेटवर्कमध्ये भरती केले. सांप्रदायिक द्वेष पसरविणे आणि धार्मिक सलोखा बिघडविणे या उद्देशाने दहशतवादी गट अनेक ऑनलाइन गट देखील चालवत होता. दिल्ली पोलिसांच्या विशेष कक्षाने गेल्या वर्षी ऑगस्ट २०२४ मध्ये रांची येथून डॉ. इश्तियाक यांना याच प्रकरणात अटक केली होती. आता दानिशलाही रांची येथून अटक करण्यात आली आहे. तो एक वॉन्टेड गुन्हेगार आहे आणि त्या प्रकरणात फरार होता. गेल्या वर्षी हरियाणामध्ये प्रशिक्षण देणाऱ्या व्यक्तीचे नाव दहशतवादी मॉड्यूलमध्येही समोर आले होते. दिल्ली पोलिसांनी हरियाणातून ६ ते ७ संशयितांनाही अटक केली होती.

२८ ऑगस्ट रोजी नेपाळमार्गे बिहारमध्ये ३ पाकिस्तानी दहशतवाद्यांच्या घुसखोरीची बातमी समोर आली होती. पोलीस मुख्यालयाने तिघांचेही फोटो प्रसिद्ध केले होते. हे सर्वजण जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेशी संबंधित असल्याचे वृत्त आहे. पोलिसांनी ज्या दहशतवाद्यांचे फोटो प्रसिद्ध केले होते त्यांची नावे हसनैन अली, आदिल हुसेन आणि मोहम्मद उस्मान आहेत. बिहारच्या मोतिहारी पोलिसांनी तिन्ही दहशतवाद्यांना ५० हजारांचे बक्षीस जाहीर केले आहे. बिहारमध्ये घुसलेल्या तिन्ही दहशतवाद्यांचे पासपोर्ट देखील सापडले आहेत.

## वीजचोरीप्रकरणी महिलेविरुद्ध गुन्हा

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- घरात चोरीची वीज वापरणाऱ्या महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत महावितरणचे नाशिकरोड येथील सहाय्यक अभियंता हनुमंत हरिचंद्र आडोळे यांनी उपनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. महावितरणच्या पथकाने वीजचोरी मोहिमेअंतर्गत जेलरोड येथील गजलक्ष्मी हौसिंग सोसायटीत तपासणी केली. त्यादरम्यान तेथील रहिवासी रत्नमाला दिनेश गवळे यांच्या घरात चोरीची वीज वापरली जात असल्याचे आढळून आले. त्यानंतर फिर्यादी यांनी उपनगर पोलीस ठाण्यात रत्नमाला गवळे या महिलेविरुद्ध वीजचोरीची फिर्याद दिली असून, पुढील तपास पोलीस हवालदार हिवाळे करीत आहेत.

## चॉपरचे वार करून युवकाला जिवे मारण्याचा प्रयत्न

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- मागील भांडणाच्या कारणावरून चार जणांनी मिळून एका युवकावर चॉपरचे वार करून त्याला जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना जय भवानी रोड येथे घडली.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की फिर्यादी जिशान जलिल सय्यद (रा. मातोश्री बंगला, देवळाली गाव, नाशिकरोड) हा व त्याचे मित्र इजान व अफजान असे तिघे जण मोपेड वाहनाने नाशिक येथे बडीदर्गा येथे जात होते. जय भवानी रोड ते उपनगर नाका या रस्त्यावर फिर्यादीच्या तोंडओळखीचे आरोपी पवन घोरपडे (रा. सुंदरनगर, नाशिक), साहिल मारवाडी (रा. भालेराव मळा, नाशिकरोड), ओम् व त्याचा एक अनोळखी साथीदार अशा चौघांनी मिळून मोटारसायकलीवर येऊन



फिर्यादीला थांबविले. मागील भांडणाच्या किरकोळ कारणावरून घोरपडे याने हातातील चॉपरचे फिर्यादीला जिवे मारण्याच्या उद्देशाने वार करून दुखापत केली, तसेच इतर साथीदारांनी फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी मारून दमदाटी केली व चौघेही आरोपी मोटारसायकलीवर बसून फरारी झाले. या प्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक वायकर करीत आहेत.

## भरधाव रिक्षाच्या धडकेत वृद्ध ठार

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- रस्ता ओलांडताना भरधाव रिक्षाच्या चालकाने दिलेल्या धडकेत वृद्ध ठार झाल्याची घटना देवळाली गाव येथे घडली.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की फिर्यादी बापू अबलू पवार (रा. वडारवाडी, देवळाली गाव) यांचे वडील अबलू रामा पवार (वय ७४) हे देवळाली गाव येथे म्हसोबा महाराज मंदिरासमोर पायी रस्ता ओलांडत होते. त्यावेळी भरधाव आलेल्या एमएच १५ एफयू ६८४३ या क्रमांकाच्या रिक्षावरील चालकाने त्यांना जोराची ठोस मारली. त्यामुळे त्यांना गंभीर दुखापत होऊन अबलू पवार यांचा मृत्यू झाला. अपघातानंतर रिक्षाचालक पोलिसांना खबर न देता पळून गेला. या प्रकरणी नाशिकरोड पोलीस ठाण्यात रिक्षाचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## शहरात चार घरफोड्यांमध्ये सोन्याचांदीच्या दागिन्यांसह रोकड लंपास

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- शहर परिसरात वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या चार घरफोड्यांमध्ये सोन्याचांदीच्या दागिन्यांसह रोकड असा सुमारे तीन लाखांचा ऐवज चोरून नेल्याच्या नोंदी पोलीस ठाण्यात करण्यात आल्या आहेत.

घरफोडीचा पहिला प्रकार सावरकरनगर येथे घडला. फिर्यादी जितेंद्र सोमनाथ कामत (रा. जयश्री अपार्टमेंट, सावरकरनगर, गंगापूर रोड) हे व त्यांच्या पत्नी घरी नसताना कोणी तरी अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराच्या मुख्य दरवाजाचा लोखंडी सेफ्टी दरवाजा तोडून दुसऱ्या दरवाजाचे लॅचलॉक तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर बेडरूममध्ये असलेली तीन लोखंडी कपाटे उघडून त्यात असलेली ९० हजार रुपये किमतीची ३० ग्रॅम वजनाची सोन्याची पोत, ३० हजार रुपये किमतीची एक तोळ्याची सोन्याची कर्णफुले, ९ हजार रुपये किमतीची नथ, मुरणी व मणी, तीन हजार रुपये किमतीचे सहा ग्रॅम वजनाचे चांदीचे दोन जोडवे, आठ हजार रुपये किमतीचा हैदराबादी नेकलेस व दहा हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण १ लाख ५० हजार रुपये किमतीचा ऐवज घरफोडी करून चोरून नेला. या प्रकरणी गंगापूर पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार मोहिते करीत आहेत.

घरफोडीचा दुसरा प्रकार सराफ बाजारात घडला. याबाबत कन्हैया दामोदर काजळे (रा. पगडबंद लेन, सराफ बाजार, नाशिक) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात म्हटले, की सराफ बाजारातील पगडी गणेश मंदिराच्या लाकडी दरवाजाचे कुलूप अज्ञात चोरट्याने कशाच्या तरी सहाय्याने तोडून मंदिरात प्रवेश केला. गणेशमूर्तीच्या कानातील २५ हजार रुपये किमतीची सोन्याची बाळी, आठ हजार रुपये किमतीचे चांदीचे कडे, दहा हजार रुपये किमतीच्या चांदीच्या पादुकांसह दानपेटी फोडून त्यातील १५०० रुपये असा एकूण ४५ हजार ५०० रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्याने मंदिर फोडून चोरून नेला. या प्रकरणी सरकारवाडा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, याबाबत पुढील तपास पोलीस हवालदार बागूल करीत आहेत. (पान ६ वर)

## दसऱ्यानंतर ओबीसींचा एल्गार

**मुंबई (भ्रमर वृत्तसेवा)** :- मराठा समाजाला ओबीसींमधून आरक्षण देण्याचा जीआर राज्य सरकारने काढल्यानंतर ओबीसींमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी पसरली आहे. याचा विरोध करण्यासाठी सर्व ओबीसी मुंबईत दसऱ्यानंतर मोर्चा काढणार असल्याचे समजते. मंत्री छगन भुजबळ यांनी या जीआरविरोधात न्यायालयात जाण्याचा इशारा दिला आहे. आता मराठा समाजाच्या आंदोलनानंतर ओबीसी समाज देखील मुंबईत लवकरच महामोर्चा काढणार आहे. दसऱ्यानंतर ८ किंवा ९ ऑक्टोबर रोजी मुंबईत भव्य ओबीसी महामोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर आज ओबीसी समाजाच्या विविध संघटनांच्या नेत्यांची ऑनलाइन बैठक होणार असून, यामध्ये मोर्चाच्या अंतिम तारखेचा निर्णय घेतला जाणार आहे.

## आरटीएलमुळे विद्युत उद्योगांच्या विकासाला चालना मिळेल: मुख्यमंत्री फडणवीस

**नाशिक (जिमाका)**:- केंद्रीय ऊर्जा अनुसंधान प्रयोगशाळेच्या नाशिक येथील प्रादेशिक तपासणी प्रयोगशाळेमुळे विद्युत उपकरण उत्पादन करणाऱ्या उद्योगांना यापुढे चाचणीसाठी हैदराबाद किंवा भोपाळ येथे जावे लागणार नाही आणि विद्युत उपकरणांच्या उत्पादनांसाठी आवश्यक व्यवस्था राज्यातच तयार होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. देशातील विद्युत वाहन निर्मितीचे प्रमुख केंद्र म्हणून महाराष्ट्राची ओळख होत असून सीपीआरआयच्या नाशिक येथील प्रादेशिक तपासणी प्रयोगशाळेत विद्युत वाहन तपासणीची सुविधा झाल्यास ईव्ही उद्योगाच्या विकासाला गती मिळेल, असेही ते म्हणाले.

शिलापूर येथील सेंट्रल पॉवर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या प्रादेशिक तपासणी प्रयोगशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला केंद्रीय ऊर्जामंत्री मनोहरलाल खट्टर, सार्वजनिक पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे, सीपीआरआयचे महासंचालक आशिष सिंग आदी उपस्थित होते.

सीपीआरआयची प्रादेशिक तपासणी प्रयोगशाळा महाराष्ट्रासाठी महत्वाची ठरेल, असे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, या प्रयोगशाळेची मागणी लक्षात घेता १२ व्या वित्त आयोगात प्रयोगशाळेला मान्यता देण्यात आली आणि आज एक चांगली व्यवस्था तयार झाली आहे. यापूर्वी विद्युत उपकरण तपासणीवर खर्च अधिक होत असल्याने या क्षेत्रातील गुंतवणूकीला मर्यादा येत होत्या. आरटीएलमुळे ट्रान्सफॉर्मरपासून विद्युत उपकरणांपर्यंत विविध उत्पादनांसाठी आवश्यक व्यवस्था तयार होईल. राज्यात पुणे, नाशिक



आणि छत्रपती संभाजीनगर येथे ईव्ही उत्पादनाला चालना देण्यात येत असून प्रयोगशाळेमुळे या क्षेत्रालाही फायदा होईल.

**ऊर्जा क्षेत्रात २ लाख कोटींची गुंतवणूक**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली ऊर्जा क्षेत्रात मोठे परिवर्तन झाले आहेत. वीज वापराचा दर गेल्या २५ वर्षाच्या तुलनेत येत्या २५ वर्षात चौपट राहणार आहे. त्यामुळे महाराष्ट्राने गेल्या ३ वर्षांत ४५ हजार मेगावॅट क्षमता स्थापित करण्याचे प्रयत्न सुरू करून राज्याला ऊर्जा क्षेत्रात स्वयंपूर्णतेकडे नेण्याचा प्रयत्न आहे. विद्युत निर्मिती, पारेषण आणि वितरणाच्या संदर्भातील २०३५ पर्यंतचे नियोजन करून राज्यात २ लाख कोटींची गुंतवणूक ऊर्जा क्षेत्रात करण्यात येत असून त्यात केंद्र सरकारचे सहकार्य मिळत आहे. त्याद्वारे विद्युत वितरणाचे जाळे निर्मिती, हरित ऊर्जा निर्मिती आणि विश्वासार्ह विद्युत वितरणावर भर देण्यात येत आहे. ऊर्जा क्षेत्रात केंद्र सरकारने सुरू केलेल्या मानांकन प्रक्रीयेत महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यात प्रलंबित असलेल्या पारेषण वाहिन्यांची कामे पूर्णत्वाकडे नेण्याचा प्रयत्न होत आहे. केंद्र सरकारने आरडीएस योजनेअंतर्गत २९ हजार कोटी राज्याला दिले, त्यामाध्यमातून मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्यात येत आहे. पुढील तीन ते चार वर्षात महाराष्ट्रात ऊर्जा क्षेत्रातील विश्वासार्ह पायाभूत सुविधा उभ्या राहतील. जगातील सर्वात मोठी सौर ऊर्जा वितरण प्रणालीवर काम राज्यात सुरू आहे. येत्या काळात १६ हजार मेगावॅट वीज निर्माण करून शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यात येईल. २०२५ ते २०३० वीजदर दरवर्षी २ टक्यांनी कमी करण्यात येणार आहे. उद्योगांसाठीदेखील वीजदर कमी करण्यात येणार असून शाश्वत वीज पुरवठ्याची सुविधा उद्योगांना उपलब्ध करून देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

**‘उद्योगाचे जंक्शन’ म्हणून नाशिकचा विकास**

नाशिक जिल्हा गुंतवणूकीचे प्रमुख केंद्र होत आहे. गेल्या सहा महिन्यात सात मोठ्या उद्योगसंस्थांनी इथे गुंतवणूक केली आहे. खाणकाम उद्योगातील उपकरणे नाशिकमध्ये तयार होणार आहेत. समृद्धी महामार्गामुळे गुंतवणुकीचे प्रमुख केंद्र म्हणून नाशिकची ओळख प्रस्थापित होत आहे. नाशिकपासून जेएनपीटीपर्यंत उत्पादनाची वाहतूक सुलभ होणार आहे, वाढवणे (पान ६ वर)

**प्रयोगशाळेमुळे मोठे उद्योग आकर्षित होतील: भुजबळ**

मंत्री भुजबळ म्हणाले, प्रादेशिक तपासणी प्रयोगशाळा विद्युत सुरक्षा आणि संशोधन तसेच उद्योगाला चालना देणारे आंतरराष्ट्रीय केंद्र आहे. विद्युत क्षेत्रातील अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या पश्चिम क्षेत्रात कार्यरत आहेत, त्यांच्यासाठी ही प्रयोगशाळा उपयुक्त ठरेल. परदेशातील उन्नत प्रयोगशाळांमधील सुविधा या प्रयोगशाळेत आहेत. सोबत नाशिकमध्ये कुशल मनुष्यबळ आणि दळणवळण सुविधा असल्याने विद्युत क्षेत्रातील मोठे उद्योग इथे आकर्षित होतील आणि नाशिकच्या विकासाला गती मिळेल. परदेशात विद्युत उपकरणे निर्यात करण्यासाठी त्यांचे नमुने परिक्षणासाठी इतर राज्यात पाठवावे लागत होते. नाशिक हे इलेक्रीचक हब बनवायचे आहे. इथे प्रदूषण असणारे उत्पादन न होता कृषी प्रक्रीया करणारे आणि प्रदूषणमुक्त उत्पादन करणाऱ्या उद्योगसंस्थांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे. त्यामुळे रोजगार निर्मितीसोबत नाशिकच्या वैभवात भर पडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## पेस्ट कंट्रोल ठेकेदाराला लाखाचा दंड

### मनपाकडून अटी-शर्तीनुसार फवारणी केली नसल्याचा ठपका

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** औषध व धूर फवारणीचा ठेका दिलेल्या एस अँड आर पेस्ट कंट्रोल सर्विसेस या ठेकेदार कंपनीकडून अटी-शर्तीनुसार फवारणी केली जात नसल्याने नाशिक महानगर-पालिकेच्या मलेरिया विभागाने ठेकेदाराला एक लाख नऊ हजारांचा दंड केला आहे.

फॉगिंग मशीन बंद असणे, जीपीएस बंद असणे असा ठपका मलेरिया विभागाने ठेकेदारावर ठेवला असून, सातपूर व सिडको विभागात फवारणीसाठी ठेकेदाराची नेमणूक करण्यात आलेली आहे. गेल्या चार महिन्यांपासून शहर परिसरात मोठ्या प्रमाणावर डेंग्यूसह इतरही साथीच्या आजारांच्या रुग्णांमध्ये वाढ झाली आहे.

डेंग्यूसह साथीच्या आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी मनपाकडून औषध फवारणीसाठी दोन ठेकेदार नियुक्त करण्यात आले आहेत. त्यापैकी सिडको आणि सातपूर येथील फवारणीचा ठेका एस अँड आर पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेसला देण्यात आला आहे. ठेकेदाराकडून अटी व शर्तीनुसार धूरफवारणी केली जात नसल्याचा ठपका मलेरिया विभागाने ठेवला असून, ठेकेदाराने दोन व्हेइकल माउंटेड वॉशिंग मशीन्स, १२ हॅण्ड फॉगिंग मशीन्स, १०७ जीपीएस ट्रॅकिंग डिव्हाइसेस लावणे आवश्यक होते. मात्र, मलेरिया विभागाच्या पाहणीदरम्यान ठेकेदाराने जुनेच मशीन लावून फवारणी सुरू केल्याचे समोर आले. तसेच, अनेक कर्मचाऱ्यांना जीपीएस नसल्याची बाबही समोर आल्याने मलेरिया विभागाने ठेकेदाराला नोटीस बजावली होती. त्यावर ठेकेदाराने समाधानकारक उत्तर न दिल्याने दंड ठोठावून ती रक्कम बिलातून वळती करण्याचे निर्देश लेखा विभागाला दिले आहेत. सप्टेंबर महिन्यात अवघ्या नऊ दिवसांत डेंग्यूचे ४२ रुग्ण आढळून आले आहेत. ऑगस्ट महिन्यात डेंग्यूने शंभरी ओलांडली होती. सततच्या पावसामुळे डेंग्यूबाधितांचा आकडा १२४ पर्यंत पोहोचला होता. जानेवारीपासून आतापर्यंत डेंग्यूचे ३८८ रुग्ण आढळून आले आहेत.

> महापालिकेच्या मलेरिया विभागाने केलेल्या पाहणीत एस अँड आर पेस्ट कंट्रोलने अटी व शर्तीनुसार औषध व धूर फवारणीसाठी आवश्यक साहित्य व सामग्री उपलब्ध केलेली नसल्याचे आढळून आले. त्यामुळे ठेकेदारावर दंडात्मक स्वरूपाची कारवाई केली आहे.
> – डॉ. योगेश कोशिरे, मलेरिया विभागप्रमुख, मनपा, नाशिक

## घरफोडीचा गुन्हा उघडकीस; ६७ ग्रॅम सोने जप्त

**नवीन (नाशिक प्रतिनिधी) :-** अंबड परिसरात घडलेल्या घरफोडीच्या गुन्ह्यातील आरोपीस गुन्हे शाखा युनिट क्रमांक २ नाशिक शहर यांनी अटक करून तब्बल ६७ ग्रॅम सोन्याचे दागिने जप्त केले आहेत. आरोपीने त्याच्या साथीदाराच्या मदतीने ही चोरी केल्याची कबुली दिली आहे.

फिर्यादी यांच्या अनुपस्थितीत आरोपीने घरातील लोखंडी कपाटातून सोन्याची चेन व अंगठी असा अंदाजे ५ लाख ६९ हजार ५०० रुपये किंमतीचा ऐवज चोरून नेला होता. याबाबत अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याच्या तपासासाठी गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक व पथकाने घटनास्थळी




भेट देऊन माहिती संकलन सुरू केले. पोलीस उपनिरीक्षक मुक्तारखान पठाण व सपोउनि गुलाब सोनार यांना गोपनीय माहिती मिळाल्यानुसार चुंचाळे शिवार, अंबड येथे इनोव्हा रबर कंपनीसमोर एक इसम चोरीचे दागिने विक्रीस आणणार असल्याचे समजले. पथकाने सापळा रचून प्रशांत उर्फ बापू प्रकाश दुधे (वय ४४, रा. जुने सिडको, नाशिक) याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने अंबड येथील घरफोडीची कबुली दिली. तसेच चोरीचे दागिने सुर्यकांत गोवर्धन आहिरराव (वय ४६, रा. जुने सिडको) याच्या मदतीने विक्रीस आणल्याचे सांगितले.

पोलिसांनी दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्या कब्जातून ६७ ग्रॅम सोने हस्तगत केले आहे. अंबड पोलीस ठाण्यात याप्रकरणी पुढील कारवाई सुरू आहे.

ही कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि हेमंत तोडकर, पोउनि मुक्तारखान पठाण, सपोउनि गुलाब सोनार, पोहवा नंदकुमार नांदुडकर, अतुल पाटील, वाल्मिक चव्हाण, मनोज परदेशी, प्रकाश महाजन यांनी केली आहे.




## राशीभविष्य

- **मेष** : जुनी येणी वसुल होतील. गृहोपयोगी वस्तुंची खरेदी होतील. कार्यक्षमता वाढ्वण्यासाठी प्रयत्न होतील.
- **वृषभ** : कौटुंबिक समस्या भेडसावतील. प्रेम प्रकरणात मतभेदाची शक्यता आहे. स्पर्धामध्ये यश मिळेल.
- **मिथुन** : आश्चर्याची सुखद अनुभूती येईल. उत्सवी वातावरणात समाधान लाभेल. बाकी चिंता करू नये.
- **कर्क** : आजचा दिवस धावपळीचा राहील. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. अनपेक्षित धनलाभ संभवतो.
- **सिंह** : नवीन ओळखी होतील. कामानिमित्त प्रवास फायदेशीर ठरेल. स्थावर प्रश्न पुन्हा प्रलंबित राहतील.
- **कन्या** : गुंतवणूक विचारानं करावी. वाद-विवादात अकारण मध्यस्थी नको. वैवाहिक नात्यात सुख लाभेल.
- **तूळ** : आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. कौटुंबिक कामं प्रलंबित राहतील. नोकरीत प्रगतीला वाव मिळेल.
- **वृश्चिक** : नवीन संकल्पनांना चालना मिळेल. प्रिय व्यक्तिंचा सहवास लाभेल. ग्रहमानाची अनुकूलता राहील.
- **धनु** : आध्यात्मिक प्रगती होईल. दूरच्या नातेवाईकांच्या भेटी होतील. बोलताना शब्दांचा वापर जपून करा.
- **मकर** : घराच्या दृष्टीने केलेली गुंतवणूक फायदेशीर ठरेल. वाहन चालवताना काळजी घ्या. विचारानं रहा.
- **कुंभ** : वैवाहिक जीवनात मतभेद संभवतात. मुलांचे प्रश्न चिंता वाढवतील. जुनी दुखणी पुन्हा उद्भवतील.
- **मीन** : आर्थिक अडचणींवर मात करता येईल. विवाहविषयक प्रयत्नांना अनुकूलता राहील. चिंता नसावी.

### हेअर स्टायलिंग

## ट्रेंडी हेअरस्टाईल

या सणावारांच्या दिवसांत काही नव्या हेअरस्टाईल्स आवर्जून ट्राय करा.

* फंकी बन- केस स्प्रे करावेत. त्यानंतर नीट विंचरून पोनी बनवावी. पोनीच्या छोट्या छोट्या लेअर्सनी बॅक कोंबिंग करावं. केस फुलतील याची काळजी घ्यावी. हेअर एक्स्टेंशन भोवताली गुंडाळून पिन अप करावं.

* पेन्सिल बन- केसांचं योग्य पार्टीशन करावं. थोड्या उंचीवर ठेवून पोनी बनवावी. हेअर जेलनी केस सेट करून घ्यावेत. त्यानंतर पेन्सिलच्या सहाय्याने पोनीच्या छोट्या लेअर्स पेन्सिलभोवती गुंडाळून घ्या. त्यानंतर मागच्या बाजूला पिन लावून घ्या. यानंतर पेन्सिल काढून घ्या. समोरच्या बाजूच्या केसांना ट्विस्ट करून बीडस लावावेत.

* ओपन हेअरस्टाईल- सर्वप्रथम इअर टू इअर पार्टीशन करावं. त्यानंतर छोटे छोटे सेक्शन करून कर्लिंग रॉडने कर्ल्स करून पिन लावावी. काही वेळाने पिन्स काढून टाकाव्यात. केस एका बाजूला घ्यावेत आणि मोतीचेनने सजवावेत.

## ११ सप्टेंबर

### दिनविशेष

१९०१ : मराठीतील श्रेष्ठ कवी आत्माराम रावजी देशपांडे ऊर्फ अनिल यांचा जन्म.

१९८७ : सुप्रसिद्ध हिंदी कवयित्री महादेवी वर्मा यांचे निधन.

२०१४ : जमिनीवरून जमिनीवर मारा करणाऱ्या 'अग्नी १' क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेण्यात आली.

२०१७ : अमेरिकन ओपन टेनिस स्पर्धेत राफेल नदालने पुरुष एकेरीचं विजेतपद जिंकलं.

### स्टडी टिप्स

## मुलांनो, वाचन करा!

स्मार्टफोन, कॉम्प्युटरच्या नादात वाचनाचं प्रमाण कमी होत आहे. पण मित्रमैत्रिणींनो, तुम्ही वाचायला हवं. वाचनाचे बरेच फायदे आहेत. वेगवेगळ्या विषयांची पुस्तकं वाचल्याने तुम्हाला अभ्यासातही त्याचा लाभ होऊ शकतो.

* वाचनमुळे तुमची शब्दसंपत्ती वाढेल. याचा फायदा बोलताना आणि लिहिताना होईल. पेपर लिहिताना तुम्ही वेगळे शब्द वापरू शकता. तुम्हाला वेगवेगळे प्रोजेक्ट्स करायचे असतात. त्यातही वाचनाचा उपयोग होऊ शकतो.

* वाचनामुळे स्मरणशक्ती सुधारते. पुस्तकातली विविध पात्रं, घटना तुम्हाला लक्षात ठेवाव्या लागतात. सध्याच्या काळात आपण इंटरनेटवर सर्च करतो. यामुळे स्मरणशक्तीवर परिणाम होऊ लागला आहे.

* पुस्तक वाचताना तुम्ही वेगळा विचारही करता. यामुळे विचार करण्याची क्षमता वाढते. विश्लेषण करण्याची क्षमताही सुधारते.

* सोशल मिडिया आणि मल्टीटास्किंगमुळे आपल्यावर खूप ताण येतो. पण पुस्तक वाचनाता तुम्ही संपूर्ण लक्ष त्यावर केंद्रित करता. यामुळे अभ्यासावरही तुम्ही जास्त चांगल्याप्रकारे लक्ष केंद्रित करू शकता.

### पंचांग

**गुरूवार, ११ सप्टेंबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, भाद्रपद कृष्ण ४, नक्षत्र : अश्विनी, चंद्रराशी : मेष, योग : ध्रुव, सूर्योदय : ६.२८, सूर्यास्त : ६.४३

### फॉरवर्डस

**फिक्र हैं सबकों ख़ुद क़ो साबित करनें क़ी...**

**जैसें ये ज़िन्दग़ी, ज़िन्दग़ी नहीं क़ोई इल्ज़ाम हैं...!**

### आरोग्यमंत्र

## का खावं सोयाबीन ?

सोयाबीनमध्ये लोह आणि कॉपर हे दोन घटक मोठ्या प्रमाणात आढळतात. ज्यामुळे तुमच्या शरीरात पुरेशा लाल रक्त पेशी निर्माण होतात. तज्ञांच्या मते लाल रक्त पेशींची निर्मिती योग्य प्रमाणात झाल्यामुळे शरीरातील रक्ताभिसरण सुधारतं आणि शरीराला पुरेसा ऑक्सिजन मिळतो. रक्ताभिसरण सुधारण्यासाठी आहारात पुरेसं सोयाबीन हवं. सोयाबीनमध्ये फॉलिक असिड आणि बी कॉप्लेक्स भरपूर प्रमाणात असतं. गर्भावस्थेमध्ये महिलांच्या शरीराला ते आवश्यक असतं.गर्भवती महिलांनी सोयाबीनचा आहारात समावेश केल्यास त्यांच्या शरीराला हे पोषक घटक मिळतात त्यामुळं गर्भाच्या वाढीसाठी आणि विकासासाठी तसंच सुलभ प्रसूतीसाठी उपयोग होतो. सोयाबीन खाण्यामुळे ह्रदयाच्या अनेक समस्या कमी होतात. ह्रदयाचं आरोग्य सुरक्षित राहण्यासाठी शरीरात बॅड कोलेस्ट्रॉल कमी आणि गुड कोलेस्ट्रॉल योग्य प्रमाणात असावं लागतं. सोयाबीनमध्ये असलेल्या लेसीथीनमुळे रक्तवाहिन्यांमध्ये कोलेस्ट्रॉल साचून राहत नाही, म्हणूनच ह्रदयविकार असलेल्या लोकांनी सोयाबीनचा आहारात अवश्य वापर करावा. सोयाबीनमध्ये भरपूर प्रमाणात प्रोटिन्स आणि कॅल्शिअम असतात. हाडं मजबूत होण्यासाठी त्यांची शरीराला गरज असते. ॲनिमिया अथवा अशक्तपणा असलेल्या लोकांनी नियमित सोयाबीनची भाजी खाल्ली तर शरीरातल्या लाल रक्त पेशी वाढतात आणि हाडं मजबूत होतात. शरीराचा योग्य विकास करण्यासाठी सोयाबीन हा एक चांगला पर्याय आहे.



### ग्रुमिंग

सध्या सगळीकडे चारकोल फेस मास्कची चर्चा आहे. चारकोल हे नेमकं काय प्रकरण आहे हे जाणून घ्यायला हवं. अशा फेस मास्कमध्ये ॲक्टिवेटेड चारकोलचा वापर केला जातो. विषारी घटकांना बांधून ठेवणं, अशुद्ध घटक आणि ब्लॅकहेड्स ऑक्सिडाइज करून चेहऱ्यावरून काढून टाकणं या क्षमता त्यात असतात. चारकोल मास्कवाल्या पट्ट्या त्वचेतलं अतिरिक्त तेल आणि बॅक्टेरिया काढून टाकतात. चारकोल फेसमास्कमुळे चेहरा उजळतो. असं असलं तरी त्वचेसाठी उपयुक्त असलेली तेलंही चारकोलमुळे निघून जातात. या तेलामुळे धूळ, प्रदूषण, बॅक्टेरियांपासून त्वचेचा बचाव होतो.

### करिअरवाटा

## अभ्यास विक्रीशास्त्राचा

सध्या सुपर मार्केट तसंच मॉल्सची संख्या वाढत असताना अशा ठिकाणी सर्व विभागांच्या कामांसाठी त्या त्या कामाचं कौशल्य असणाऱ्या आणि पुरेसं प्रशिक्षण घेतलेल्या कर्मचाऱ्यांची गरज भासत असते. मॉलमध्ये ग्राहकांच्या मानसशास्त्राचा बारकाईने विचार केलेला असतो. मॉलमधला माल कसा मांडला आहे यावर विक्री अवलंबून असते. त्यादृष्टीने मांडणीचा विचार करणाऱ्या व्हिज्युअल मर्चंटायझिंग या शास्त्राचा किंवा कौशल्याचा उदय झाला. या शास्त्रात कोणत्या वस्तू किती उंचीवर ठेवाव्या याचाही सूक्ष्म विचार केला जातो. अधिक खपणाऱ्या, अधिक प्रमाणात खरेदी केल्या जाणाऱ्या वस्तू प्रथदर्शनी असतात आणि कमी विकल्या जाणाऱ्या वस्तू मागे ठेवल्या जातात. मॉलच्या दर्शनी भागातील वस्तूंच्या मांडणीतून होणारी सजावट आकर्षक नसेल तर विक्रीवर परिणाम होतो. खेरीज मॉल कोणत्या प्रकारचा आहे, त्याचा प्रमुख ग्राहक कोणत्या वर्गातला आहे याचा विचार करूनही वस्तू मांडाव्या लागतात. मॉलचा ग्राहक मध्यमवर्गीय असेल तर उच्चवर्गीयांनाच परवडतील अशा वस्तू समोर ठेवून चालत नाही. त्याशिवाय त्याची मांडणीही लोकांना त्या हाताळता याव्या अशी करावी लागते. तुम्हीही हे शास्त्र अभ्यासू शकता.



### खेचाखेची

## ग्रुप स्टडी

**बाबा-** काल रात्री कुठे होतास?

**मुलगा-** मित्राच्या रुम वर ग्रुप स्टडी करत होतो.

**बाबा-** रात्रीची ऊतरली नाही का अजुन?

**मुलगा-** काय???

**बाबा-** तुला नौकरी लागुन चार वर्ष झालीत आता...

### वेगळं काही

अमेरिकेतल्या एका चोराने चक्क लिंबांची चोरी केली. हा चोर ७० वर्षांचा ज्येष्ठ नागरिक आहे. या माणासाने एक-दोन नाही तर तब्बल ३६२ किलो लिंबू चोरले. फियरोस असं या चोराचं नाव आहे. हा माणूस गाडीतून लिंबू चोरून नेत होता. सिग्नलला थांबलेल्या गाड्यांची तपासणी सुरू असताना त्याच्या डिकीतून लिंबू भरलेली पोती बाहेर पडली. हे सगळे लिंबू ताजे होते. हा माणूस दुसऱ्या बाजारात जाऊन लिंबू विकण्याच्या तयारीत होता. या परिसरात भुरटे चोर फळं, भाज्यांची थोड्या फार प्रमाणात चोरी करून जातात. इथल्या लोकांना याची सवय झाली आहे. पण एवढ्या मोठ्या प्रमाणात लिंबू चोरीला गेल्यानंतर शेतमालकाने पोलिसांत तक्रार केली आणि चोराला पकडलं.


### फिटनेस मंत्रा

## अतिरेकी व्यायाम टाळा

सध्या युवकांप्रमाणेच युवतीदेखील लग्नाचा निर्णय घेण्यास विलंब करतात. उच्च शिक्षण आणि कारकिर्दीत स्थिरस्थावर झाल्यानंतर लग्नाचा विचार करेपर्यंत तिशी उलटलेली असते. मात्र या दरम्यान व्यस्त दिनचर्या, कामाचा ताण, खाण्याच्या अयोग्य सवयी यामुळे अनेकांचा देह स्थूलतेकडे झुकलेला असतो. त्यामुळे नंतर व्यायाम आणि डाएट पाळलं तरी लग्न करुन मातृत्व स्वीकारणाऱ्यांना युवतींवर मानसिक ताण येऊ शकतो. वजन कमी करण्यासाठी व्यायामाचा सल्ला दिला तरी काहींना व्यायामानंतर खूप थकवा जाणवतोय. मासिक पाळीच्या तक्रारीदेखील वाढतात. अशा वेळी व्यायाम किती आणि कसा करावा, पूरक आहार कोणता घ्यावा यासंबंधी तज्ज्ञांकडून माहिती घेणं गरजेचं ठरतं. प्रमाणापेक्षा अधिक व्यायाम केल्यामुळे थकवा जाणवू शकतो. याला अमेनोरिया अथवा रजोरोध म्हणतात. भरपूर व्यायाम पण योग्य प्रमाणात कॅलरींचा अभाव यामुळे हा त्रास होतो. वजन कमी करण्यासाठी फॅट कटरचा आधार घेतल्यास धोका संभवतो. त्यामुळेच आधी आहार आणि व्यायामाविषयी जाणकारांचा सल्ला घ्यावा. अतिरेकी व्यायाम टाळावा.



## शब्दकोडे क्रमांक २०३०



**आडवे शब्द :-**


१) ह्या विमानांनी बालाकोटवर बॉम्ब वर्षाव केला
७) सपाट
१०) मीठ
११) एक क्षार
१२) पंधरवडा
१३) मुसलमानांचा उपवासाचा महिना
१५) वांती
१७) अवस्था, स्थिती
१८) अगदी गोलाकार
१९) जिम्मेदार
२१) सप्तस्वरातील पहिला स्वर
२३) पंकज
२४) नाश, शेवट, लय
२५) बाण
२६) मनातील इच्छा
२७) भांडण, चर्चा
२८) मनाला वाटणारी अनिश्चिततेची भीती
३०) शक्ती, जोर, बळ
३२) मर्यादा, सीमा
३३) विळखा
३४) शेवटचा भाग
३६) आवळा फळाचा एक गोड औषधी प्रकार
३७) देवाचे मानवी रूप
३८) कर्ज देणारा
४१) उंट हाकणारा
४३) च्या पुढे, च्या देखत
४५) लेखणीच्या एका फटक्याने दुसऱ्याचे कायमचे नुकसान करणारा
४८) सुस्ती
५०) श्रीरामाच्या एका पुत्राचे नाव
५१) प्रेमळ
५२) उत्तम सोने
५५) विशेष
५७) नोकर
५८) हेळसांड
५९) लपेटी अक्षराचा फाटा
६१) स्त्री, बाई
६२) पंख
६३) आजोबा
६४) कापड
६६) उद्याच्या नंतरचा दिवस
६८) मत्सर
६९) वाळवू ठेवलेली पालेभाजी
७०) नाविकदल

**उभे शब्द :-**

१) सूर्याचे एक नाव
२) जन्मापासून
३) ताठा, गर्व
४) हिरव्या विषारी सापाची जात
५) कंटाळवाणे (भाषण)
६) आजोबांचे वडील
७) घरोघर जाऊन भविष्य सांगणारा
८) तापविणारा सूर्य
९) अवधान, चित्त
१४) नंतर
१६) मृताची क्रिया
१८) श्रीविष्णूचे बटु रूप
१९) कथिल व शिसे यांचा मिश्र धातू
२०) कापडी बैठक, सतरंजी
२२) ऐक्य, तादाम्य
२३) उणीव
२४) शेराचा अठवा भाग
२८) पळापळ
२९) जुळा
३१) फणसाचा एक प्रकार
३३) अगदी क्षुल्लक किमतीचे
३४) नवऱ्याच्या दुसऱ्या बायकोबद्दलचा द्वेष
३५) सैन्यदल
३६) मयूर
३८) लहान
३९) अंजन
४०) वचक, भीती
४१) शिर्डीचे संत
४२) बुटका
४४) कोकणातील एक दैवत
४६) जलदीने, झटकन
४७) मनाचा ओढा
४८) थारा
४९) सोबती, मित्र
५३) सततची हालचाल
५४) प्रेतावरचे वस्त्र
५६) कमीजबरोबरचे एक वस्त्र
५८) थप्पड
५८) आजोबा
६०) घोड्याची लाथ
६३) कुंभाराची भट्टी
६५) एक अधिक एक चतुर्थांश
६७) लक्ष्मीचे एक नाव

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## सणासुदीला पीएनजी ज्वेलर्सनी दिली ग्राहकांना प्युअर प्राईस ऑफर

**नाशिक (भ्रमर वार्ताहर) :-** १९२ वर्षांची परंपरा लाभलेले पीएनजी ज्वेलर्स पुन्हा एकदा आपल्या बहुप्रतीक्षित 'प्युअर प्राईस ऑफर' मोहिमेसह सज्ज झाले आहे. दि. १ ते २१ सप्टेंबर या कालावधीत राबविण्यात येणारी ही योजना आगामी सण व लग्नसराईच्या हंगामात ग्राहकांना सोने खरेदी करताना आर्थिक दिलासा व आत्मविश्वास देण्यासाठी खास तयार करण्यात आली आहे.

सोन्याच्या किमतीत सतत होणाऱ्या वाढीचा विचार करून, ही मोहीम ग्राहकांना योग्य समाधान देणारी आहे. या योजनेत ग्राहकांना त्यांच्या आवडीचे सोने किंवा हिऱ्यांचे दागिने दि. १ ते २१ सप्टेंबर या कालावधीत विद्यमान दराने प्री-बुक करण्याची संधी मिळते. जर नंतर सोन्याचा दर वाढला, तरीही त्यांना आधीच्या कमी दराचा लाभ मिळतो आणि जर दर कमी झाला, तर पीएनजी ज्वेलर्स बिलिंगच्या वेळी कमी झालेला दर मान्य करून ग्राहकांना दिलासा देते. अशा प्रकारे ग्राहक नेहमीच फायद्यात राहतात. ही योजना ग्राहकांचा ताण कमी करून सोने खरेदी अधिक सोपी व खात्रीशीर करते. त्यामुळे ग्राहक किमतीतील चढउताराची चिंता न करता दागिन्यांच्या डिझाईन्स निवडण्यात लक्ष केंद्रित करू शकतात.

या मोहिमेबाबत पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, कि भारतीय कुटुंबांसाठी सोने ही केवळ गुंतवणूक नसून, भावनिक व सांस्कृतिक दृष्टीनेही महत्त्वाची गोष्ट आहे. 'प्युअर प्राईस ऑफर'च्या माध्यमातून आम्हाला ग्राहकांना पारदर्शक, निश्चिंत व फायद्याचा खरेदी अनुभव द्यायचा आहे. हीच ग्राहक व पीएनजी ज्वेलर्समधील विश्वासाची जोडणी आहे. ग्राहकांना प्युअर प्राईस ऑफरचा लाभ पीएनजी ज्वेलर्सच्या महाराष्ट्रातील सर्व दालनांत घेता येणार आहे.

## संदीप दिवे यांचे निधन



**नाशिकरोड (भ्रमर प्रतिनिधी) :-** जेलरोड भगवा चौक येथील रहिवासी संदीप तुळशीराम दिवे (वय ४८) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी व मुलगी असा परिवार आहे. चंद्रकांत दिवे, शशिकांत दिवे, बाळासाहेब दिवे यांचे ते लहान बंधू होत.

सभी शुभअंक संख्याशास्त्र और ज्योतिषशास्त्र पर आधारित है।

गुरुवार
११/९/२०२५
कल्याण शुभअंक

| | | |
|---|---|---|
| १ | ५ | ९ |
| २९० | ४५६ | २७० |
| ३३५ | ५५५ | ३७९ |
| १३ | ५१ | ९५ |
| १५ | ५३ | ९७ |

गुरुवार
११/९/२०२५
मुंबई शुभअंक


| | | |
|---|---|---|
| २ | ४ | ६ |
| ४८० | ३४७ | १२३ |
| ४९९ | २४८ | ३३० |
| २४ | ४६ | ६२ |
| २६ | ४८ | ६४ |


## छोट्या जाहिराती

**Recruitment**
Required Housekeeping Staff and Cashier in Hotel at Panchvati. Call : 9421565821 12/9

**ज्योतिष**
ज्योतिषशास्त्र, वास्तुशास्त्र व जन्मकुंडलीप्रमाणे. श्री प्रभूज्योतिष ऋषी. **संपर्क : काश्यपी फ, मामा मुंगी कार्यालयामागे, पंपिंग स्टेशन, गंगापूर रोड, नाशिक. मो. नं. ७५०७००६३८६.**

**वाचकांना सूचना :-** भ्रमर वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्याची पूर्तता जाहिरातदाराकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल भ्रमर वृत्तपत्र जबाबदार राहणार नाही कृपया याची नोंद घ्यावी.



# क्राईम डायरी

## अमृतधामला घरफोडी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने घरातील रोकड व महत्त्वाची कागदपत्रे असा ५५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना अमृतधाम येथे घडली. फिर्यादी संगीता ज्ञानेश्वर जाधव (रा. सत्साहेब बंगला, साईनगर, अमृतधाम) यांच्या राहत्या घराचे कुलूप अज्ञात चोरट्याने कशाच्या सहाय्याने तोडून घरात प्रवेश केला. घरात असलेली ५५ हजार रुपयांची रोकड, संगीता जाधव व त्यांच्या पतीचे आधार कार्ड, पॅन कार्ड, गॅस कार्ड, रेशन कार्ड, तसेच बँकेचे पासबुक असा ऐवज दि. ३१ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर यादरम्यानच्या कालावधीत घरफोडी करून चोरून नेला. या प्रकरणी पंचवटी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार कोरडे करीत आहेत.

## मोलकरणीने लांबविले दागिने

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** डॉक्टर व त्यांची पत्नी बाहेरगावी गेल्याची संधी साधून मोलकरणीने पतीच्या मदतीने घरातील सोन्याचे दागिने व डायमंड असा एक लाख रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना अंबड येथे घडली. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की फिर्यादी शशांक दिगंबर पवार (रा. शमी बंगला, खोडे मळ्याजवळ, नाशिक) हे डॉक्टर आहेत. ते दि. ७ ते ९ सप्टेंबरदरम्यान पत्नीसह मालेगाव येथे क्लिनिकच्या कामासाठी गेले होते. या अनुपस्थितीचा फायदा घेऊन डॉ. पगार यांच्या घरी काम करणारी मोलकरीण संगीता घनश्याम सोनार व तिचा पती घनश्याम सोनार यांनी फिर्यादीच्या घरातील बेडरूममधील ड्रॉवरमध्ये असलेले १ लाख २ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व डायमंड चोरी करून ते कुठे तरी पसार झाले. या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात मोलकरणीसह तिच्या पतीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, याबाबत पुढील तपास पोलीस हवालदार देसले करीत आहेत.

## जबरीने मोटारसायकलीची चोरी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** इसमाच्या हातावर टोकदार वस्तूने वार करून त्याच्या ताब्यातील मोटारसायकल जबरीने चोरून नेल्याचा प्रकार सातपूर येथे घडला. फिर्यादी महेंद्र रामभाऊ पवार (रा. ओझर मिग, ता. निफाड) हे दि. ८ सप्टेंबर रोजी सकाळी ९ च्या सुमारास सातपूर एमआयडीसीतील रेणुका कंपनीच्या कॉर्नरजवळ उभे होते. त्यावेळी एका २५ ते ३० वयोगटातील अज्ञात इसमाने फिर्यादीस धक्का मारून मोटारसायकलीवरून खाली पाडले. त्यानंतर आरोपीने काही तरी टोकदार वस्तूने पाठीवर, डाव्या हातावर दुखापत करून फिर्यादी यांच्या ताब्यातील एमएच १५ डीडी २२४९ या क्रमांकाची मोटारसायकल बळजबरीने चोरून नेली. या प्रकरणी सातपूर पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक बुवा करीत आहेत.

## ट्रॅक्टरसाठी विवाहितेचा छळ

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** ट्रॅक्टर घेण्यासाठी माहेरून पाच लाख रुपये आणण्याची मागणी करून विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी पतीसह सासू, दीर, जाऊ व आजेसासू यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की फिर्यादीचे आडगाव परिसरात माहेर आहे. ही विवाहिता दि. १ सप्टेंबर २०२३ ते दि. ९ सप्टेंबर २०२५ या दरम्यानच्या कालावधीत पिंपळनारे येथे सासरी नांदत होती. त्यावेळी पती, सासरे, जाऊ व आजेसासू यांनी संगनमत करून विवाहितेला माहेरून ट्रॅक्टर घेण्यासाठी पाच लाख रुपये आणण्याची मागणी केली. ही मागणी पूर्ण केली नाही म्हणून विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ करून तिला मारहाण केली, तसेच विवाहितेच्या आईवडिलांना शिवीगाळ करून धमकी दिली. या प्रकरणी आडगाव पोलीस ठाण्यात पतीसह पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, याबाबत पुढील तपास पोलीस हवालदार पाटील करीत आहेत.

## तरुणीचा ऑनलाईन विनयभंग

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** तरुणीचे फोटो मॉर्फ करून ते सोशल मीडियावर प्रसारित करून तिची बदनामी व ऑनलाईन विनयभंग केल्याप्रकरणी एका जणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सायबर पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की इन्स्टाग्राम सोशल मीडिया प्रोफाईलवर फिर्यादीच्या मुलीच्या नावाने ओपन केलेल्या कल्याणी १२०७ या इन्स्टाग्रामच्या बनावट प्रोफाईलवरून तिच्या फोटोशी मॉर्फ केलेले मिरर सेल्फीचे फोटो अपलोड करून सर्वांना दिसतील, असे प्रसारित केले, तसेच तरुणीला फ्रेंड रिक्वेस्ट पाठवून तिच्या स्त्रीमनास लज्जा उत्पन्न होईल, असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. या प्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात अज्ञात प्रोफाईलधारकाच्या विरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक पाटील करीत आहेत.

## घरांवर व वाहनांवर दगडफेक

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** बेकायदेशीर जमाव जमवून घरांसह वाहनांवर दगडफेक करून नुकसान करणाऱ्या टोळक्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की आरोपी किशोर बाबूराव वाकोडे (वय ३०, रा. कोळी वाडा, नानावली, जुने नाशिक) व त्याचे पाच ते सहा साथीदार यांनी बेकायदेशीर जमाव जमवून नानावलीतील मानूर रोड येथे संतोषी माता चौकात घरांवर व वाहनांवर दगडफेक केली. फिर्यादी सुभाष सहदेव पटेल (रा. फेमस बेकरीजवळ, नानावली, नाशिक) व इतरांची सुरक्षितता धोक्यात आणून हातात कोयते घेऊन बाहेर उभ्या असलेल्या वाहनांवर कोयते व दगड मारून नुकसान केले. त्यानंतर जोरजोरात शिवीगाळ करून हे टोळके पळून गेले. या प्रकरणी भद्रकाली पोलीस ठाण्यात टोळक्याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार शेख करीत आहेत.

# पाणी प्रश्नावरून प्रधान सचिवासमोर महिलांनी वाचला समस्यांचा पाढा

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** महापालिकेत प्रभागरचनेवर पाणीपुरवठा विभागाचे प्रभाग सचिव संजय खंदारे यांच्या प्रमुख उपस्थितीत सुनावणी झाली. दरम्यान, सुनावणी सुरू असतानाच महिलांकडून पाणी प्रश्नावरून काहीसा गोंधळ उडल्याची परिस्थिती उद्भवली.

आगामी नाशिक महापालिका निवडणुकीसाठी शासनाच्या आदेशावरून महापालिकेकडून शहरातील प्रारूप प्रभागरचना जाहीर करून नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या. यासंदर्भातील मंगळवारी मनपा मुख्यालयात सुनावणी झाली. दरम्यान, प्रभाग २२, ३१ याबाबत सुनावणी झाल्यावर पिंपळगाव खांब भागातील महिलांनी एकत्र येत खंदारे यांच्यासमोरच आपल्या भागात नियमित पाणीपुरवठा होत नसल्याची तक्रार केली. आमच्या भागात पाण्याचा प्रश्न गंभीर झाला असून, पाणी पुरेसा येत नाही व कमी दाबाने येते, अशी तक्रार केली. यामुळे सुनावणीचा मुद्दा सोडून वेगळ्याच कारणाने ही बैठक चर्चेत आली.

यावेळी खंदारे यांनी मनपा अधिकाऱ्यांकडे पाहत या महिलांच्या तक्रारींची दखल घ्या, अशी सूचना केली. यावेळी महापालिका आयुक्त मनीषा खत्रीदेखील उपस्थित होत्या. महिलांनी आपल्या भागातील पाणीपुरवठा सुरळीत करण्याबाबत मागणी केली. दरम्यान, सुनावणीच्या कामात कुठलाही व्यत्यय नको म्हणून महिला पोलिसांनी पुढे येऊन महिलांना शांत करण्याचा प्रयत्न केला. शहरात पाण्याचा प्रश्न गाजत असून, पाण्याचा कमी दाबाने पुरवठा होत असल्याने नागरिकांना मोठा त्रास होतो आहे. मंगळवारी सुनावणीसाठी शासनाचे पाणीपुरवठा विभागाचे प्रधान सचिव येत असल्याने त्यांच्या दरबारी महिलांनी पाण्याची समस्या मांडून लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

# श्री स्वामी समर्थांचे वेगवेगळ्या आविष्कारांतून कार्य : कुलकर्णी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** श्री स्वामी समर्थ महाराज यांनी वेगवेगळ्या अविष्कारात काम केले. दत्त अवतारात महाराजांमध्ये वेगळा पैलू दिसून येतो असे प्रतिपादन दिंडोरी श्री स्वामी समर्थ केंद्राचे स्वाध्यायी मुकुंद कुलकर्णी यांनी केले. संत कवी दासगणू दत्त मंडळ व संस्कृत भाषा सभा यांच्या वतीने आयोजित भक्ती – सेवा – श्रद्धा व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प ब्रह्मांडनायक दत्ता अवधूत श्री स्वामी समर्थ महाराज या विषयावर त्यानी गुंफले. आपल्या व्याख्यानात ते म्हणाले, स्वामी महाराज हेच दत्तप्रभू आहेत महाराजांचा कालखंड १८५६ ते १८७८ म्हणजेच २२ वर्ष अक्कलकोटमध्ये राहिले. सर्वसामान्यांना त्यांचा हाच कालखंड माहीत आहे; परंतु यापूर्वीही महाराज अनेक ठिकाणीही फिरले आहेत. हिमालय, हरिद्वार, गिरनार, अंबेजोगाई, नारायण सरोवर व मंगळवेढा या भागातही ते गेलेले आहेत. तेथे बारा वर्षे राहिले आहेत. त्यानंतर ते अक्कलकोट मध्ये आले. महाराजांच्या जन्माविषयी असे म्हटले जाते की नरसिंह सरस्वती निजानंद गमनानंतर तीनशे वर्षांनी महाराज प्रगट झाले. अशी त्यांची कथा आहे; परंतु महाराज अयोनिज होते. त्यामुळे महाराजांचा जन्म नक्की कुठे आणि कसा झाला याविषयी अनेक मतमतांतरे आहेत. प्रख्यात ज्योतिषी रेकी यांच्या संदर्भानुसार महाराज प्रगट झाले ११४९ मध्ये पंजाब प्रांतात. एका बालक मूर्तीत. ती मूर्तीच म्हणजेच स्वामी महाराज. महाराजांचा कार्यकाळ ७२९ वर्षांचा होता. या भूतलावावर महाराजांनी ७२९ वर्ष आपले अवतारकार्य वेगवेगळ्या स्वरूपात केले आहे असे कुलकर्णी यांनी सांगितले. नारायणदास पिठले महाराज हे स्वामींचे पट्टशिष्य होते. ब्रह्मीभूत मोरेदादांना त्यांनी दीक्षा दिली. त्यानी श्री स्वामी समर्थ सेवा कार्य सुरू केले. त्यानंतर प पू अण्णासाहेब मोरे काम करीत आहेत, असे ते म्हणाले. श्री स्वामी समर्थ महाराज हे अवधूत आहेत. अवधूत हा वैराग्यातील सर्वोच्च उच्च कोटीचा प्रकार मानला जातो. तो प्रकार महाराजांना अवगत होता. त्यामुळे त्यांच्या वर कुठलीही बंधने नव्हती, असेही त्यांनी सांगितले.

प्रारंभी अथर्व केळकर यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. मीना वाटवे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. पाहुण्यांचा परिचय शोभा सोनवणे यांनी करून दिला. यावेळी संस्थेच्या वतीने गुणीजनांचा सत्कार करण्यात आला. त्यात राजश्री केळकर, यशश्री कुलकर्णी, उल्हास कुलकर्णी, मुक्तेश्वर मुनशेट्टीवार, प्रमोद सोनसळे, सरिता देशमुख व रमेश देशमुख यांचा समावेश होता. यावेळी हिमाचल प्रदेशामधील शिमला येथील प्रादेशिक उपायुक्त संदीप कदम हे उपस्थित होते. संस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास शहर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सणासुदीच्या काळात अन्न व औषध प्रशासनाची विशेष मोहीम

**नाशिक (जिमाका वृत्तसेवा) :–** सणासुदीच्या काळात नागरिकांना सुरक्षित व सकस अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत यासाठी अन्न व औषध प्रशासनामार्फत विशेष मोहीम राबविली जाणार आहे. यासाठी मिठाई विक्रेते व नागरिकांना दक्षता घेण्याचे आवाहन अन्न व औषध प्रशासन, नाशिक सहआयुक्त (अन्न) दि. ज्ञा. तांबोळी यांनी प्रसिद्धिपत्रकान्वये केले आहे.

**अन्न व्यावसायिकांनी घ्यावयाची दक्षता**

कच्चे अन्नपदार्थ व खवा हे परवानाधारक वा नोंदणीधारक अन्न व्यावसायिकांकडून खरेदी करावेत व त्याबाबतची खरेदी बिले ठेवावीत. प्रत्येक अन्न व्यावसायिकाने त्याच्या विक्री बिलावर अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ अंतर्गत प्राप्त परवाना वा नोंदणी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे, अन्नपदार्थ तयार करताना पिण्यायोग्य पाण्याचा वापर करावा, अन्न पदार्थ स्वच्छ व सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावेत, कामगारांची त्वचा व संसर्गजन्य रोगापासून मुक्तीबाबतची वैद्यकीय तपासणी करण्यात यावी, मिठाई तयार करताना केवळ फुडग्रे खाद्यरंगाचा १०० पी. पी. एम. च्या आतच वापर करावा, बंगाली मिठाई ही ८ ते १० तासांच्या आत खाण्याबाबत पॅकेजिंग मटेरिअलवर निर्देशित करण्यात यावे, स्पेशल बर्फीचा वापर मिठाई तयार करण्यासाठी करू नये, माशांचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी जाळीदार झाकणे व बंदिस्त शोकेसचा वापर करावा, फरसाण तयार करताना वापरण्यात येणारे खाद्यतेल हे दोन ते तीन वेळाच वापरण्यात यावे. त्यानंतर ते बायोडिझेल कंपन्यांना देण्यात यावे.

नागरिकांना सुरक्षित व निर्भेळ अन्न उपलब्ध होण्यासाठी, तसेच त्यात होणारी भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासन दक्षता घेत असून, ही मोहीम दिवाळीपर्यंत सुरू राहणार आहे.

याबाबत अधिक माहितीसाठी प्रशासनाचा टोल फ्री क्रमांक १८००२२२३६५ यावर वा fdanashik2022gmail.com या इमेलवर संपर्क साधावा. अन्न पदार्थांच्या तक्रारी असल्यास FoScos या प्रणालीवर ऑनलाईन तक्रार करावी, असे आवाहनही सहआयुक्त तांबोळी यांनी केले आहे.

## पावसाची विश्रांती

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** गेल्या आठवडाभरापासून संततधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले होते. आता पावसाने विश्रांती घेतल्याने दिलासा मिळाला आहे. जिल्ह्यातही अनेक भागात हलक्या आणि रिमझिम पाऊस पडल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला आहे.

# श्री महावीर विद्यालयात शिक्षकांचा गौरव




**लासलगाव (भ्रमर वार्ताहर) :–** भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षकदिन म्हणून सर्वत्र साजरी केली जाते. लासलगाव येथील श्री महावीर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षकदिन उत्साहात साजरा करण्यात आला. शिक्षक दिनानिमित्त संस्थेतर्फे श्री महावीर विद्यालयातील सर्व शिक्षक – शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष जवाहरलाल ब्रह्मेचा हे होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन सहकार भारती महाराष्ट्र प्रदेशाचे संघटन मंत्री शरद जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे मानद सचिव शांतीलाल जैन, खजिनदार अजय ब्रह्मेचा, संचालक मोहनलाल बरडिया, महावीर चोपडा, अमित जैन, सुनील आब्बड व संस्थेचे पालक प्रतिनिधी अक्षय ब्रह्मेचा, तसेच प्राचार्या पल्लवी चव्हाणके, पर्यवेक्षक शिवाजी धुमाळ उपस्थित होते. प्रमुख अतिथींच्या हस्ते विद्येची देवता सरस्वती माता व माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले, तसेच संस्थेचे संस्थापक शिक्षण महर्षी स्व. बाबूलाल ब्रह्मेचा यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यालयाचे संगीत शिक्षक सचिन आहेर व गीतमंचाने स्वागत केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाच्या प्राचार्या पल्लवी चव्हाणके यांनी केले. प्रास्ताविकातून त्यांनी शिक्षकदिनाचे महत्त्व सांगितले. विद्यालयाचे उपशिक्षक ज्ञानेश्वर मोहन यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनचरित्राविषयी माहिती सांगितली. प्रमुख अतिथींच्या हस्ते विद्यालयातील सर्व शिक्षक–शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांचा भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी शरद जाधव यांनी आपल्या मनोगतातून सांगितले, की विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणारे शिक्षक पूजनीय आहेत. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अध्यापन करण्याबरोबरच त्यांच्यामध्ये नैतिक मूल्यांचा विकास करावा शैक्षणिक कार्याचा गौरव केला. तसेच प्रमुख अतिथी जवाहरलाल ब्रह्मेचा व शांतीलाल जैन यांनी आपल्या मनोगतातून शिक्षकांच्या कार्याचा गौरव केला. शिक्षकदिन कार्यक्रमाची विद्यार्थी प्राचार्या गुंजन महाजन हिने शिक्षक दिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन उपशिक्षिका प्रियंका साळवे व आभार पर्यवेक्षक शिवाजी धुमाळ यांनी केले. शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थी शिक्षकांनी शिक्षकाचे कामकाज पार पाडले. शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थी शिक्षकांनी इ. ५ वी ते १२ वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना अध्यापन केले. या कार्यक्रमास विद्यालयाचे सर्व शिक्षक–शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी शिक्षक उपस्थित होते.

# कंधाणे विद्यालयाच्या खो–खो संघांचा तालुकास्तरीय स्पर्धेत विजय

**बागलाण (भ्रमर वार्ताहर) :–** जनता विद्यालय, मुंजवाड येथे पार पडलेल्या बागलाण तालुकास्तरीय खो–खो स्पर्धेत श्री स्वामी समर्थ विद्याप्रसारक मंडळ, डांगसौंदाणे संचलित के. टी. बिरारी माध्यमिक व विज्ञान उच्च माध्यमिक विद्यालय, कंधाणे येथील दोन्ही संघांनी १९ वर्षांखालील मुले व १९ वर्षांखालील मुलींनीह्रप्रभावी खेळ खेळत प्रथम क्रमांक पटकावला आहे.

या उल्लेखनीय यशामागे विज्ञान विभागाचे प्राचार्य पवन काकुळते, कला विभागाचे प्राचार्य शशिकांत सूर्यवंशी, प्रा. कल्याणी अहिरे, प्रा. दुर्गा चौरे, प्रा. कोमल अहिरे, प्रा. धीरज सूर्यवंशी, तसेच इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

संघांच्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश वाघ व विद्यमान अध्यक्षा वैशाली वाघ यांनी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शकांचे अभिनंदन केले. बागलाण तालुका क्रीडा विभागाचे तालुकाध्यक्ष गणेश वाघ, मधुकर देवरे, शांताराम भदाणे, विजय सूर्यवंशी, आबा अहिरे, विशाल अहिरे, आर. जी. जाधव, दिनेश माळी आदींनी स्पर्धा आयोजनासाठी परिश्रम घेतले.




# भावडेच्या एस. के. डी. इंटरनॅशनल स्कूलमध्ये शिक्षकदिन साजरा



**देवळा (भ्रमर वार्ताहर) :–** भावडे येथील एस के. डी इंटरनॅशनल स्कूलमध्ये पारंपरिक शिक्षक दिनाऐवजी प्रत्येक कालखंडातील शिक्षण पद्धतीवर प्रकाश टाकून प्राचार्य व शिक्षकांनी साधू–संतांची वेशभूषा करून सध्याच्या कालखंडानुसार शिक्षण कसे बदलत गेले व भविष्यातील शिक्षण कसे असेल, याचे प्रात्यक्षिक सादर केले.

गुरुकुल शिक्षण पद्धती, संत परंपरेतील शिक्षण, ब्रिटिशकालीन शिक्षण, स्वातंत्र्योत्तर शिक्षण आधुनिक शिक्षण व भविष्यकालीन शिक्षण यात विविध शिक्षकांचे प्रत्येक शिक्षण पद्धतीनुसार गट केले व या गटांनी आपली शिक्षणपद्धती प्रत्येक्ष वातावरणनिर्मिती व त्या कालावधीतील शैक्षणिक पद्धत प्रत्यक्षात सादर केली.

यात प्रामुख्याने गुरुकुल शिक्षण पद्धतीत स्वतः प्राचार्य सुनील पाटील, पर्यवेक्षक सुधीर सोनवणे, अजय बच्छाव, भोईर, रूपाली ठाकरे, प्रियंका पटणे, भाग्यश्री शिरोळे यांनी आध्यात्मिक, नैतिक, अस्त्रशस्त्रविद्या आणि योग, आयुर्वेद, व्यावहारिक शिक्षण, अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र प्रत्यक्ष त्या कालखंडातील वेशभूषा करून झाडांच्या सावलीखाली वरील विषयांचे प्रत्यक्ष शिक्षण दिले व विद्यार्थ्यांनीही कालखंडानुसार प्रतिसाद नोंदविला.

संत परंपरेतील शिक्षणात संदीप देवरे, केशव सोनवणे, पूनम मॅडम, ऊर्मिला शेवाळे, रजनी मॅडम व मनिषा मॅडम, भाग्यश्री पाटील व स्नेहल चौधरी यांनी प्रत्यक्ष संतांची वेशभूषा करून निर्गुण भक्ती, प्रेम, निष्काम कर्म, प्रवचन व अभंगाद्वारे व्यक्तीमध्ये आंतरिक व बाह्य बदल घडवून आचरण सुधारून जाती–प्रथांना विरोध करून समाजवादी व्यक्ती घडविण्यासाठी प्रवचनातून लोकशिक्षण दिले.

ब्रिटिश कालखंड शिक्षण प्रणालीत शंकर पवार, कावेरी पवार, पल्लवी कदम, सोनाली जाधव, विकास शिंदे, स्वाती कटोरे यांनी पाश्चात्त्य दृष्टिकोनातून शिक्षित वर्ग निर्माण करणे; परंतु यात पारंपरिक मूल्यांना दिले गेलेले आव्हान शिकवण्यातून सादर करण्यात आले.

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील शिक्षणात भाग्यश्री देवरे, माधुरी दराडे, सारिका देवरे, स्वप्नजा देवरे, सारिका केदार, रूपाली आढाव व ऋतुजा रायते यांनी महात्मा गांधीच्या मूल्यांवर आधारित, राष्ट्रीय विकास अनुकूल, कौशल्य, प्रात्यक्षिक व तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण सादर केले. आधुनिक शिक्षण प्रणालीत वैभव जाधव, गायत्री बोरसे, रूपाली पवार, शीतल निकम, किरण चव्हाण व माधुरी गायकवाड यांनी विद्यार्थीकेंद्रित दृष्टिकोनातून, सक्रिय भागीदारी, समस्या समाधानावर भर, प्रायोगिक उपयोग असे मिश्र शिक्षण आपल्या पाठातून सादर केले. भविष्यकालीन शिक्षण प्रणालीमध्ये सीमा बावा, अंजली आहेर, समय, ययाती जाधव, नीलक्षा मॅडम, भाग्यश्री जाधव व सायली वाघ यांनी कृत्रिम बुद्धिमता वापरून विद्यार्थी आपली आवड व गती यानुसार शिकत असताना, शिक्षकाची बदललेली भूमिका, ऑनलाईन हायब्रीड शिक्षण प्रारूप सादर केले. या अनोख्या उपक्रमांचे संस्थेचे चेअरमन संजय देवरे, सचिव मीना देवरे व पालकांनी शिक्षक व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# युवा प्रतिष्ठानच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त पारितोषिक वितरण

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** वनविहार कॉलनी येथील युवा प्रतिष्ठान मित्रमंडळाच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांच्या पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमाप्रसंगी भाजपच्या युवा नेत्या रश्मी हिरे यांनी आपल्या मनोगतात युवा प्रतिष्ठान मित्रमंडळाचा हा स्तुत्य उपक्रम असून, त्यामुळे स्पर्धकांचे मनोबल निश्चितच वाढणार आहे. प्रमुख पाहुणे सामाजिक कार्यकर्ते प्रशांत गवळे, ऋषिकेश गायधनी, रमेश कडलग, युवा कार्यकर्ते सुमित भिसे, प्रवीण आमरे व युवा प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांच्या हस्ते स्पर्धेतील यशस्वी झालेल्या स्पर्धकांना मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आले. युवा प्रतिष्ठान मित्रमंडळाच्या वतीने चमचा लिंबू, बादलीत बॉल टाकणे, संगीत खुर्ची, फॅन्सी ड्रेस, पोता शर्यत, फॅन्सी ड्रेस, नृत्य व गायन आदी स्पर्धा घेण्यात आल्या. हर्षल राठोड व त्यांच्या सहकाऱ्यांच्या वतीने रक्ततपासणी व रक्तसंकलनाचा उपक्रम राबविण्यात आला. स्पर्धांचे परीक्षक म्हणून यामिनी नववाल यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन संकेत शिवलकर यांनी केले. आभार गिरीश गवळे यांनी मानले. कार्यक्रमास युवा प्रतिष्ठानचे कार्यकर्ते समीरण ठाकूर, हर्षल राठोड, अमित शिरसाट, शुभम् कुशारे व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# रामकालच्या जमीन संपादन प्रक्रियेला सुरुवात

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी रामकाल पथाच्या निर्मितीला सुरुवात झाली आहे. दोन टप्प्यांमध्ये निविदा काढून कामांना मुहूर्त लावला आहे.

दरम्यान, काही ठिकाणी रामकालला जागेअभावी अडचण येत असल्याने त्यासाठी महानगरपालिकेने जमीन भूसंपादन प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली आहे.

पंचवटी परिसरातील रामकाल पथ विकास प्रकल्पासाठी नाशिक महानगरपालिकेने जमीन संपादन प्रक्रिया सुरू केली आहे. यासंदर्भात महापालिकेकडून सूचना प्रसिद्ध केली आहे.

महानगरपालिकेने संबंधित जमीनमालकांनी स्वतःहून नगरविकास विभागाशी संपर्क साधून आवश्यक कागदपत्रांच्या आधारे तातडीने महानगरपालिकेशी सहकार्य करावे; अन्यथा ही जमीन अधिग्रहित करण्याची व बोलीप्रक्रियेतून पुढील कारवाई करण्याची वेळ येईल, असेही सुचविले आहे.

तसेच जमिनीसंबंधी इतर कोणतेही दावे हक्क, वाद, दानपत्र, करारनामा, वारसा, विकसन करार आदी असल्यास सात दिवसांच्या आत महानगरपालिकेकडे लेखी हरकती दाखल करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दिलेल्या मुदतीनंतर कोणत्याही हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, रामकाल पथ प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या जागांमध्ये एकूण १९४४.३० चौरस मीटर क्षेत्र विकासासाठी निश्चित करण्यात आले आहे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

Digitally signed online bids are invited through SRM E-tender process of MSETCL in two bid system from bidders who are registered Electrical Vendors / Contractors of MSETCL for following SRM E-tender;

| RFx No. | E-Tender No. | Particulars | Estimated Cost | EMD | Tender Fees |
|---|---|---|---|---|---|
| 7000037556 | T- 18/ 2025-26 | Bi-Annual Maintenance Contract for attending emergency / breakdown maintenance work of various 220kV & 132kV lines under EHV O&M Circle, Bhusawal as & when required basis | Rs. 100 Lakhs | Rs. 1,00,000/- | Rs. 590/- |
| 7000037557 | T- 19/ 2025-26 | Bi-Annual Maintenance Contract for attending emergency / breakdown maintenance work of various 400kV lines under EHV O&M Circle, Bhusawal as & when required basis | Rs. 100 Lakhs | Rs. 1,00,000/- | Rs. 590/- |

**Sale period:**10.09.2025 to 25.09.2025, **Last Date of Submission:** 25.09.2025 up to 13:00 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 25.09.2025 at 15:00 Hrs (if possible). **Contact person:** Executive Engineer, EHV PC O&M Zone, Nashik. Phone No. 0253-2403010/02/07 Fax No. 0253-2403000, for further details please visit to **https://srmetender.mahatransco.in**

**Please note that, future retendering notices / amendments to this tender if any will be published on MSETCL's website only**

**Chief Engineer**
**EHV PC O&M Zone,**
**MSETCL, Nashik.**

**नाशिक महानगरपालिका, नाशिक**
**वृक्षप्राधिकरण व उदयान विभाग**
**महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ (३)अन्वये**
**वृक्ष तोडणे/छाटणी बाबत जाहीर नोटीस**

नाशिक महानगरपालिका हद्दितील सातपूर विभागाअंतर्गत धोकादायक वाळलेले व बांधकाम बाधित वृक्ष तोडणे/ पुनर्रोपण/ छाटणी बाबत वर नमुद अधिनियमातील कलम ८ (२) अन्वये लेखी अर्ज सादर करणेत आले आहेत.

| अनु. क्र. | अर्जदार | जागेचा पत्ता | वृक्ष संख्या |
|---|---|---|---|
| १ | श्री ओंकार टोरे | हॉटेल अमृत गार्डन जवळ सातपुर | १ |
| २ | श्रीम विमल माळी | राज्य कर्मचारी सोसायटी | ५ |
| ३ | श्री मधुसुदन ढगे | वन विहार कॉलनी | ४ |
| ४ | श्री अभिजीत पान | श्रमीक नगर | १ |
| ५ | श्री निरज मालपाठक | गुलमोहर विहार कॉलनी | १ |
| ६ | श्री रविद्र कवठे | गंगापुर शिवार | १ |
| ७ | श्री विवेकानंद कुलकर्णी | काळे मळा | २ |
| ८ | श्री विशाल खैरनार | सदगुरु नगर | १ |
| ९ | श्री शाम जाधव. | सुयोजित गार्डन | १ |
| १० | श्री. श्रीकांत पाटील | विस्डम हायस्कुल जवळ गंगापूर | २ |
| ११ | श्री त्रंबक काशिनाथ जाधव | नवश्या गणपती जवळ | ३ |

सदरच्या अर्जदार यांनी वृक्षप्राधिकरण सातपुर येथे अर्ज दाखल केले आहेत. ज्या अर्थी, वृक्ष प्राधिकरणाकडे प्राप्त झालेल्या अर्जाबाबत अधिनियमातील कलम ८ ( ३ ) अन्वये स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन कमाल ०७ (सात) दिवस कालावधी मध्ये हरकती तथा सुचना मागविणेचे सुचित केले आहे. त्याअनुषंगाने अधिनियमातील अटी व शर्ती अधिन राहून प्राप्त अर्जाची छाननी झाल्यानंतरच त्याबाबतच्या अहवालासह वृक्ष अधिकारी सातपूर यांचे स्वाक्षरीने प्रस्ताव तयार केले आहे. सदरचे प्रस्ताव सातपुर विभागीय कार्यालय उद्यान विभागात उपलब्ध असून प्रस्तुत प्रकरणी हरकती तथा सुचना असल्यास लेखी स्वरुपात सातपुर विभागीय कार्यालय येथे जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून ७ (सात) दिवसांच्या मुदतीत द्याव्यात मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

जनसंपर्क/जा.क्र./२४८/२०२५
दि. १०/०९/२०२५

गोदा प्रदुषण टाळा, भविष्य संभाळा.

सही /–
विभागीय अधिकारी तथा वृक्ष अधिकारी
सातपूर विभागीय कार्यालय
नाशिक महानगरपालिका, नाशिक

# संपादकीय

## नेपाळमधील अस्थिरता

गेल्या अनेक दशकांपासून शांत असलेला नेपाळ अलीकडच्या काळात अस्थितरतेच्या गर्तेत का सापडला आहे? याची कारणे त्यासाठी शोधावी लागतील. मंत्र्यांना आंदोलकांनी घरात घुसून सळो की पळो करून सोडले, नेपाळच्या राष्ट्रपतींसह पंतप्रधान, गृहमंत्र्यांना २४ तासांत राजीनामा द्यावा लागेल, हे दोन दिवसांपूर्वी कोणाच्या स्वप्नात आले नसेल; पण ते प्रत्यक्ष घडले. पशुपतीनाथाच्या भूमीत जनतेचे तांडवरूपी रौद्ररूप पाहून सत्तेच्या सिंहासनावर बसलेल्यांना पायउतार व्हावे लागले. नेपाळ सरकारने नुकतेच एक नवीन विधेयक संसदेमध्ये आणले होते, ज्यात परदेशात चालविणाऱ्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मना स्थानिक प्रतिनिधी नियुक्त करणे हे बंधनकारक केले होते. त्यानंतर ४ सप्टेंबरला नेपाळ सरकारने फेसबुक, इन्स्टाग्राम व यूट्यूबसह २६ सोशल मीडिया ॲप्सवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला. हे प्लॅटफॉर्म नेपाळच्या दळणवळण आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाकडे नोंदणीकृत नसल्याचा सरकारचा आक्षेप होता. नेपाळ सरकारने जर सोशल मीडिया ॲपवर बंदी घातली, ती सर्व अमेरिका आणि युरोपमधील असल्याने चीनमध्ये त्यावर आधीपासूनच बंदी आहे. चीनने पाश्चात्य देशांची विचारसरणी रोखण्यासाठी स्वतःचे ॲप विकसित केले आहेत. नेपाळमध्येही त्याच धर्तीवर प्रयत्न सुरू केले गेले. दुसरीकडे चिनी ॲप्सवर का बंदी घालण्यात आली नव्हती, याचेही नेपाळी जनतेला आश्चर्य वाटत होते. नेपाळमधील युवा वर्गात नेपाळ सरकारच्या या निर्णयाने प्रचंड संतापाची लाट उसळली. राजधानी काठमांडूसह देशभरात निदर्शने उसळली. संतप्त तरुणांनी काठमांडूच्या नवीन बाणेश्वर संसद संकुलात घुसखोरी केली. पोलिसांचे बॅरिकेड्स तोडून त्यांनी संसदेच्या आवारात घुसखोरी केली, ज्यामुळे तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली. नेपाळी काँग्रेसचे अध्यक्ष आणि माजी पंतप्रधान शेरबहादूर देऊबा यांच्या बुढानिलकांठा येथील निवासस्थानाचीही निदर्शकांनी तोडफोड केली. हिंसक जमावापुढे सरकारला नांगी टाकावी लागली. नेपाळमध्ये तरुणाईला 'जेन-झी' नावाने संबोधले जाते. सोशल मीडियावरील बंदीनंतर हा मोठ्या प्रमाणात रस्त्यावर आलेला दिसला. सरकारने मोठ्या खुबीने सुप्रीम कोर्टाची ढाल पुढे करून बंदीचा आदेश आणल्याने युवा वर्गाने सुरुवातीला शांततापूर्ण आंदोलनांची शपथ घेतली; पण पोलिसांनी त्यांना रोखण्यासाठी अश्रूधुराच्या नळकांड्या व पाण्याच्या तोफांचा वापर सुरू केल्याने परिस्थिती चिघळली. मोठ्या प्रमाणात गोंधळ उडाला. सोशल मीडियाचा वापर हा तरुणाईच्या जगण्याचा एक भाग बनला असल्याने, अन्य देशात जर अशा बंदीचा निर्णय झाला, तर तेथेही नेपाळसारखी स्थिती उद्‌भवू शकते, हा इशारा यातून मिळाला आहे. नेपाळमधील आंदोलनात २१ तरुणांचा बळी गेला आहे. सरकारने सोशल मीडियावरील बंदीचा निर्णय मागे घेण्याची घोषणा केल्यानंतरही आंदोलक शांत झाले नाहीत. आंदोलकांनी पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांचे निवासस्थान पेटवून दिले. या सर्व पार्श्वभूमीवर बांगलादेश, श्रीलंका, मालदिवसह भारताच्या सीमेवरील देशात अस्थिरता आणि घुसखोरीचा प्रयत्न चीनी भाईकडून सातत्याने सुरू आहे. नेपाळमधील यादवीला तेच कारणीभूत असावेत, असा सूर आंतरराष्ट्रीय पातळीवर उमटतो आहे.

# विविध मागण्यांसाठी आरोग्य विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** नियमित सेवेत कायम करण्याचा शासननिर्णय होऊनही मागील १६ महिन्यांचा कालावधी उलटूनही त्याची अंमलबजावणी न झाल्याने राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत विविध पदांवर काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी आयटकचे राज्य सचिव राजू देसले यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला.

जिल्हा शासकीय रुग्णालयापासून सुरू झालेला मोर्चा जिल्हा परिषद, खडकाळी, शालिमार, महात्मा गांधी रोड मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पोहोचला. मोर्चात जिल्हाभरातील आरोग्य विभागातील कंत्राटी कर्मचारी व अधिकारी सहभागी झाले होते. माझे समायोजन माझी जबाबदारी, एकच मिशन समावेशन, दहा वर्षांवरील सेवा झालेल्या सर्वांचे समायोजन झालेच पाहिजे, अशा विविध मागण्यांचे फलक घेऊन कर्मचारी मोर्चात सहभागी झाले होते. काही महिलांनी पीपीई किट परिधान केले होते. मोर्चात सहभागी झालेल्या कर्मचाऱ्यांनी विविध घोषणा देत परिसर दणाणून सोडला. जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचल्यानंतर मोर्चाचे सभेत रूपांतर झाले. यावेळी मान्यवरांनी भाषणे केली. शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

निवेदनात म्हटले आहे, की राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आम्ही गेल्या अनेक वर्षांपासून विविध पदांवर काम करीत आहोत. दि. १४ मार्च २०२४ रोजी आम्हाला नियमित सेवेत समावेश करण्यासाठी शासनाचा निर्णय झाला आहे; मात्र १६ महिन्यांचा कालावधी उलटूनही त्याची अद्याप पूर्तता झाली नाही. मानधन वाढ, लॉयल्टी बोनस, ईपीएफ, इन्शुरन्स अशा मागण्यांसाठी आरोग्य मंत्र्यांसमवेत बैठक होऊन त्यावेळी विविध आश्वासने देण्यात आली; मात्र त्याचीही पूर्तता झाली नसल्याने आम्ही काम बंद आंदोलन सुरू केले आहे. हे आंदोलन राज्यस्तरावर असून, राज्यातील सर्वच कर्मचारी यात सहभागी झालेले आहेत.

कर्मचारी शिष्टमंडळास शासन चर्चेस बोलावून सकारात्मक निर्णय लेखी स्वरूपात देणार नाहीत तोपर्यंत हे आंदोलन सुरू राहणार आहे. शासन स्तरावरून याबाबत योग्य तो प्रतिसाद मिळावा, अशी अपेक्षा असल्याचे निवेदनात म्हटले आहे. दहा वर्षे पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांचे १०० टक्के समायोजन व प्रत्येक वर्षी ३० टक्क्यांप्रमाणे सार्वजनिक आरोग्य विभाग, ग्रामविकास विभाग, नगरविकास विभाग, वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागामध्ये समायोजन करावे, सन २०२५-२६ मध्ये दहा टक्क्यांप्रमाणे वार्षिक वाढ करावी, तीन व पाच वर्षे सेवा पूर्ण झालेल्या अधिकार व कर्मचारी यांना लॉयल्टी बोनस चालू करावा, १५ हजार ५०० व त्यापेक्षा जास्त मानधन असणाऱ्या सर्वच कंत्राटी कर्मचाऱ्यांना ईपीएफ व ग्रॅच्युइटी योजना लागू करावी, कर्मचाऱ्यांना विमा संरक्षण देण्यात यावे, कर्मचाऱ्यांच्या मानधनातील तफावत दूर करावी, सन 2023 मध्ये झालेल्या आंदोलनातील कर्मचाऱ्यांवर दाखल झालेल्या पोलीस केसेस रद्द करण्यात याव्यात, सहा वर्षांचा सेवा कालावधी पूर्ण झाल्यानंतर कंत्राटी सेवा नियमित करण्याचा निर्णय सर्वांना लागू करावा आदी विविध मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

निवेदनावर मीनाक्षी मोरे, उद्धव हंडोरे, डॉ. नीलेश पाटील, संदीप जाधव, ॲड. सुवर्ण शेपाळ, प्रतिभा पाटील, श्रुती मगर, डॉ. सुलक्षणा बैरागी, डॉ. पंकज पगार, आनंद घुगे, शरद नागरे, डॉ. तुषार पाटील, अविनाश शिंदे, सचिन सोनवणे, संदीप पाटील, संतोष नवले आदींच्या सह्या आहेत. मोर्चात जिल्हाभरातील कंत्राटी कर्मचारी सहभागी झाले होते. त्यावेळी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. मोर्चामुळे काही काळ वाहतूक विस्कळित झाली होती; मात्र पोलिसांनी ती सुरळीत केली.

# वंदना भदाणे व मेघा भदाणे यांना समाजभूषण पुरस्कार प्रदान

**देवळा (भ्रमर वार्ताहर) :-** तालुक्यातील माळवाडी येथील



वंदना भदाणे व मेघा भदाणे यांनी महिला गृह उद्योग या क्षेत्रातील उद्योजक म्हणून केलेल्या कामाची दखल घेऊन श्री संतसेना नाभिक फाऊंडेशन बागलाण यांच्या वतीने समाजभूषण पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

राम केटरर्स व महिला पुरणपोळी उद्योग चालवीत या दोन्ही महिलांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. सणवारासोबत इतर कार्यक्रमांच्या ऑर्डर्स स्वीकारत त्यांच्या हाताची पुरणाच्या पोळीला (मांडे) चांगली मागणी असते.

वंदना भदाणे व मेघा भदाणे यांनी महिला असूनही उद्योग व्यवसायात चांगला जम बसविला आहे. या पार्श्वभूमीवर हा पुरस्कार त्यांना जाहीर झाल्याने त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# सुकाकाथ मसाला

### बैलाची करामत

एक बैल रस्त्यावरून जात असतो. मध्येच तो बरोबरच्या बैलांना काही तरी म्हणतो. त्यानंतर सगळे बैल त्याला मारायला लागतात. तो इतर बैलांना काय म्हणतो? ''हाय गाईज!''

### वडिलांची पॅण्ट

वडिलांनी बंडूची तलाशी घेतली. सिगारेट व मुलींचे नंबर निघाले. वडिलांनी बंडूला बदड बदड बदडले व म्हणाले, ''केव्हापासून सुरू आहे हे सगळे?'' बंडू रडत रडत सांगतो, ''पप्पा ही पॅण्ट माझी नाही, तुमची आहे...''

### हजरजबाबी मुलगा

एक मुलगा पाय घसरून गाढवाच्या पायाजवळ पडतो. बाजूने एक मुलगी जात असते. तिने विचारले, ''काय रे, भावाच्या पाया पडतोयस का? मुलगा म्हणाला, ''होय, वहिनी!''

– पानवाला

# खाण्यासाठी चेंज हवा!

## शिंगाड्याच्या पिठाच्या चकल्या

**साहित्य :-** शिंगाड्याचे पीठ १ वाटी, नाचणीचे पीठ पाव वाटी, भिजवलेला साबूदाणा १ वाटी, उकडलेल्या बटाट्याचा किस १ वाटी, जिरे १ चमचा, मिरची पावडर पाव चमचा, साखर, चवीपुरते मीठ.

**कृती :-** शिंगाडा, नाचणीचं पीठ, साबूदाणा, बटाट्याचा किस, भाजलेले जिरे १ चमचा, तिखट, मीठ व साखर सगळे एकत्र करून कोमट पाण्यात भिजवून चांगले मळावे. त्याच्या लहान लहान चकल्या पाडाव्यात. उन्हात चांगल्या वाळवून ठेवाव्यात. गरज पडेल तेव्हा तळून खाव्यात. वाळविलेल्या चकल्या हवाबंद डब्यात ठेवल्यास खूप दिवस टिकतात.

– ऐश्वर्या राजेंद्र काळे


# सारडा कन्या शाळेत शिक्षकदिन उत्साहात साजरा



**नवीन नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन म्हणजेच शिक्षकदिन सारडा कन्या शाळेत गृहसभा प्रमुख वैशाली शिंपी व बबिता नागभीडकर यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता १० वीच्या विद्यार्थी व शिक्षकांनी उत्साहात साजरा केला.

यावेळी व्यासपीठावर मुख्याध्यापिका नंदिनी कहांडळ, पर्यवेक्षिका मृण्मयी खरवंडीकर, शिक्षक प्रतिनिधी रामदास चव्हाण आदी उपस्थित होते. शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे शिक्षकदिन होय. संस्कृती वारुळे, श्रेया अष्टेकर व वेदिका अष्टेकर यांनी डॉ. राधाकृष्णन यांच्याबद्दल माहिती सांगितली. मुख्याध्यापिका नंदिनी कहांडळ यांनी मार्गदर्शन केले. दीपप्रज्वलन व सरस्वतीपूजनाने सुरुवात झाली. श्रेया साखरे हिने प्रास्ताविक केले. मीनल विसपुते, संस्कृती मुर्तडक व समृद्धी लबडे यांनी परिचय करून दिला. सूत्रसंचालन संस्कृती कापुरे हिने केले. जान्हवी खरे हिने आभार मानले.

# भ्रमर शब्दकोडे क्र. २९६



**उभे शब्द :** १) भारताचे दक्षिणेकडील स्वामी विवेकानंदांचे स्मारक असलेले ठिकाण २) आठवण (हिंदीत) ३) गायी गुरांना चरण्यासाठी राखीव ठेवलेले क्षेत्र ४) गुटख्याप्रमाणे एक तंबाखूयुक्त पदार्थ, पिकावरील एक किड प्रकार ५) कामावरून घेतलेली सुट्टी ६) राज ठाकरे यांचा पक्ष ७) माशाचा एक प्रकार ८) हवामान, क्लायमेट (मराठीत) ९) मच्छर १४) शपथ (हिंदीत) १६/अ) पाकिस्तानची राजधानी १७) कुटील खेळी, खेळातील पाळी १८) कंबर (हिंदीत) २०) मनाला टोचणारे शल्य २२)पातळ रसा २३) बैलाच्या नाकात घालतात ती दोरी २५) पांढराच्या विरूध्दार्थी, ब्लॅक (मराठीत) २६) भवानीमातेचे प्रसिध्द मंदिर असलेले ठिकाण २७) महाभारतातील पांडवांचे चुलतभाऊ २९) श्वास घेण्याचे इंद्रिय ३१) पत्र ३२) पावसाची आतुरतेने वाट पाहणारा पक्षी ३४) व्यवहारातील चालू नाणे ३६) वस्तूची किंमत, दर ३९) पाणी भरण्याचे घरातील हंड्याच्या जोडीचे पात्र ४१) महाराष्ट्रातील प्रसिध्द नृत्य प्रकार, ४३) श्रीविष्णू पत्नी, लक्ष्मी देवी ४४) मुलाची मुलगी ४५) आकाश, गगन

**आडवे शब्द :** १)दिल्लीतील जेएनयु विद्यापीठातील आंदोलनामुळे प्रख्यात झालेला काँग्रेसचा युवा नेता ६) महाराष्ट्रातील एक विभाग १०) दार ११) स्वार्थी भावना, हव्यास १२) साठ मिनिटांचा एक ** १३) मोठ्या हॉटेलमधील आचारी (इंग्रजीत) १५) श्रीगणेश उत्सवात गणपतीच्या मूर्तीपुढे केलेली सजावट १६) महिना १६/अ) डोंगराचा उभा सुळका १८) एक म्हण-** नाही त्याला डर कशाला १९) सायकलचे चाकाच्या या भागावर टायर असतो २०) प्रॅक्टिस (मराठीत) २१) हाडाच्या या गाठीपासून पाठीचा कणा बनतो २३) एक गरम मसाल्यातील घटक, वेलदोडा २४) लोकांना कर्जाऊ पैसे देणारा २६) प्रत्येकाच्या घराच्या अंगणात ही वनस्पती असते जिची मनोभावे पूजा करतात २८) एक रंग २९) होडी, नौका ३०) अमिताभचा एक जुना चित्रपट-मि.****लाल ३२) पुणे लगतचे एक नगर ३३) विवाहितेचा छळ-**हाट ३५) एक प्रमुख शाकाहारी पदार्थ ३७) साकव, ब्रीज ३८) नशीब (इंग्रजीत) ४०) नोकर, गुलाम ४२) उत्तम धावपट्टू ४४) नाम फाऊंडेशनचे संस्थापक-** पाटेकर ४५) वन मराठीत लिहा ४६) आईची बहीण ४७) नांदेड लगतचा एक जिल्हा

**शब्दकोडे क्र. २९५ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | मि | त | दे | श | मु | ख | | स्वा | भि | मा | न |
| नि | | हा | | नि | ळा | | भा | व | | ता | ग |
| ल | हा | न | | वा | | पा | | लं | च | | र |
| क | र | | प | र | भ | णी | | बी | | दि | से |
| पू | | व | ड | | र | | चौ | | मा | न | व |
| र | ज | त | | ना | म | दा | र | | घ | | क |
| | पा | न | | व | सा | | स | च | | | |
| दो | न | दा | | | ठ | ग | | व | न | वा | स |
| प | | र | स | म | | वा | य | दा | | र | सा |
| ह | म | | जा | ने | वा | री | | र | ज | क | |
| र | न | र | | | म | | स | | ग | री | ब |
| | न | स | रू | द्दी | न | श | हा | | | | ळी |

# प्रेम फाऊंडेशनतर्फे विद्यार्थ्यांची दिंडी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** इंडिगो एअरलाइन्स अर्थसहाय्यित, अफार्म संस्था पुणे मार्गदर्शित व प्रेम फाऊंडेशन नाशिक संचलित महिला उपजीविका सक्षमीकरण कार्यक्रमांतर्गत इगतपुरी तालुक्यातील आंबेवाडी, खडकेद, वासाळी, बारशिंगवे व इंदोरे या गावांमध्ये ग्रामस्थांच्या मदतीने वड, पिंपळ, चिंच, बोर, लिंबू, आंबा, फणस, बदाम, नारळ, चिक्कू व जांभूळ अशा विविध प्रकारच्या दहा हजार वृक्षांच्या लागवडीचे ध्येय ठेवण्यात आले होते. त्यांची पूर्तता करण्यासाठी व ग्रामस्थांमध्ये वृक्ष लागवडीबाबत जनजागृती निर्माण होण्यासाठी प्रत्येक गावनिहाय शालेय विद्यार्थ्यांच्या मदतीने वृक्ष दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.



या वृक्षदिंडीत सह्याद्री माध्यमिक विद्यालय, आंबेवाडी, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा इंदोरे, श्रीराम माध्यमिक विद्यालय वासाळी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बारशिंगवे या शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या सर्व गावांतील विद्यार्थ्यांना प्रथमत: वृक्ष लागवडीचे महत्त्व पटवून देण्यात आले. सोबतच त्यांना प्रत्येकी एक रोप देऊन त्याची लागवड, संगोपन व संरक्षण करण्याची जबाबदारी देण्यात आली, तसेच जे विद्यार्थी या रोपांचे जतन व संवर्धन करतील, त्या विद्यार्थ्यांच्या रोपांचे पुढील वर्षी सर्वेक्षण करून ज्यांचे रोप जिवंत राहतील, त्यांना प्रेम संस्थेमार्फत प्रमाणपत्र व रोख बक्षीस देण्याचे जाहीर करण्यात आले. याप्रसंगी सर्व शालेय विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेऊन वृक्षलागवड, जतन व संरक्षणविषयक घोषणा देऊन जनजागृती केली.

या वृक्षदिंडीच्या यशस्वितेसाठी सर्व शाळांचे शिक्षक व कर्मचारी वृंद यांनी हिरिरीने सहभाग घेतला.

यात प्रामुख्याने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बारशिंगवेचे मुख्याध्यापक तथा केंद्रप्रमुख कैलास भवारी, मारुती धादवड, रमेश भांगरे, मारुती लोहकरे, नीता जाधव, आशा बोराडे, शंकर घारे, प्रकाश घारे, मारुती भवारी, विजय खांडवी, श्रीराम महाविद्यालय वासाळीचे मुख्याध्यापक जनार्दन परदेशी, सूर्यकांत सोनवणे, दिलीप बोराडे, मनोहर कदम, नकुल परदेशी, चेतन परदेशी, विजया बांबळे, सुनंदा धोंगडे, बाळू कदम, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा इंदोरे येथील मुख्याध्यापक उत्तम भवारी, दीपक साबळे, विलास महाले, ज्ञानेश्वर गमावले, नाना गमावले, लक्ष्मण बांडे व मंदा धादवड सह्याद्री माध्यमिक विद्यालय आंबेवाडीचे मुख्याध्यापक माधव पानसरे, सुरेश बऱ्हे, श्रीधर अहिरे, योगेश परदेशी, सुरेश थोरात, आरिफ मणियार, एकनाथ पवार व शिवाजी मोरे यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या वृक्षदिंडीच्या यशस्वितेसाठी संस्थाप्रमुख राजू शिरसाठ, अफार्म पुणेचे रूपेश ढगे, प्रभाग समन्वयक शंकर केकरे, प्रेरणा सखी लता खाडे, अनिता कोरडे, ज्योती भोईर, विश्वास कोरडे, स्वाती झोले व विधीकांत खाडे यांनी परिश्रम घेतले.

## बिबट्याच्या हल्ल्यात मुलगा ठार

**सिन्नर (भ्रमर वार्ताहर) :-** बहिणीसोबत लपंडाव सुरू होता. बहिणीला लवकर सापडू नये म्हणून दहा वर्षांचा सारंग घरामागे दडून बसला.

चोरपावलांनी मक्याच्या शेतातून आलेल्या बिबट्याने थेट सारंगची मानगूट पकडून त्याला मक्याच्या शेतात ओढून नेले. यात गंभीर जखमी झालेल्या सारंग गणेश थोरात (वय १० रा. पंचाळे, सिन्नर) या मुलाचा मृत्यू झाला. मृत सारंग हा सूर्यभान गडाख विद्यालयात पाचवीत शिक्षण घेत होता.


# जाजू विद्यालयात शिक्षकांचा सन्मान



**नवीन नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** राणेनगर येथील शारदा शिक्षण संस्था जाजू विद्यालयात शिक्षकदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

सर्वप्रथम भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रभागाचे माजी नगरसेवक अमोल जाधव, तसेच दीर्घायुषी ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने शिक्षकांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. चेतनानगर येथील भागवत सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम, कवितावाचन व भाषणातून शिक्षकांविषयी आदर व्यक्त केला. विशेष म्हणजे शालेय विद्यार्थ्यांनी एक दिवसासाठी शिक्षकांची भूमिका स्वीकारत शाळेतील कामकाज पाहिले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना शिक्षकांच्या जबाबदाऱ्यांची जाणीव झाली. कार्यक्रमास गिरीश नरगुंदे, माया बेलसरे, सुचित्रा काळे, अजय पवार, रवींद्र आगळे, हरिदास चौधरी, नीलिमा दौंड व मनीष उंडे यांच्यासह पालक-शिक्षक संघाचे पदाधिकारी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# शिक्षणात राजकारण घुसल्याने अनेक प्रश्न निर्माण : विजय चोरमारे



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** शिक्षक सर्व बाबतीत गुणवंत असावेत असा आग्रह प्रत्येक जण धरत असतो. पण शिक्षक नियुक्ती करताना होणारी व्यावहारिक भाषा योग्य नाही. शिक्षणात राजकारण घुसल्याने अनेक प्रश्न निर्माण होतात. कुलगुरूंची निवड ही सहज होत नाही. अशी परिस्थिती निर्माण झाली असून, ही बाब खूपच गंभीर असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार विजय चोरमारे यांनी केले.

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या शिक्षक दिनी सेवानिवृत्त सेवकांचा सत्कार व विद्यार्थी गुणगौरव समारंभात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मविप्रचे अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले होते. यावेळी व्यासपीठावर बाळासाहेब क्षीरसागर, ॲड. नितीन ठाकरे, दिलीप दळवी, देवराम मोगल, संदीप गुळवे, विश्वास मोरे, डॉ. भास्कर ढोके आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना विजय चोरमारे यांनी शिक्षण क्षेत्राचा सविस्तर आढावा घेतला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने गोदा आणि कृष्णा यांचा संगम झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. शाहू महाराजांनीच आरक्षणाचे धोरण सर्वप्रथम राबविले असल्याचे त्यांनी सांगितले. माजी मुख्यमंत्री स्व वसंत दादा पाटील यांनी सर्वप्रथम राबविलेले विनाअनुदान तत्त्वाचे धोरण आणि त्यामुळे शिक्षण क्षेत्रात झालेले प्रगती याचाही आढावा त्यांनी आपल्या भाषणात घेतला. आज देशभर राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा गाजावाजा होत असताना शिक्षकांवरील जबाबदारीही वाढले असल्याचे त्यांनी सांगितले. बदलत्या काळानुसार शिक्षणात संवेदनशीलता कशी येईल याकडे लक्ष द्यायला हवे. असे मतही त्यांनी आपल्या भाषणात व्यक्त केले. अध्यक्ष भाषणात डॉ. सुनील ढिकले म्हणाले, की शिक्षणातील शिक्षकांचे महत्त्व लक्षात घेऊन समाजाने पुढाकार घेऊन शिक्षकदिन साजरा केला पाहिजे. शिक्षणाच्या पद्धती बदलत आहेत. स्पर्धा परीक्षांचे स्वरूप ही बदलत आहेत.

याप्रसंगी बोलताना मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे म्हणाले कर्मवीरांच्या धोरणानुसार शिक्षण संस्थेत काम सुरू आहे. संस्थेसाठी शिक्षकांचे योगदान किती महत्त्वाचे आणि अनमोल आहे हे कधीही विसरता येणार नाही. शिक्षणाकडे नेहमीच चांगला दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. पूर्वी शिक्षकांना गावात खूपच मानाचे स्थान होते. अलीकडे त्याचे प्रमाण कमी झाले असेल तरी शिक्षकांचे महत्व आजही अबाधित आहे. पूर्वी शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये एक विशिष्ट नाते निर्माण होत असे. त्याची जाणीव विद्यार्थी कायमस्वरूपी ठेवत असत. असेही ठाकरे यांनी आपल्या भाषणात सांगितले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमापूजन करण्यात आले. त्यानंतर मविप्रचे गीत, स्वागत गीत विद्यालयाच्या गीतमंचाने सादर केले. उपाध्यक्ष विश्वास मोरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय शिक्षणाधिकारी डॉ. भास्कर ढोके यांनी करून दिला. ॲड. नितीन ठाकरे यांच्या हस्ते विजय चोरमारे यांचा सत्कार करण्यात आला. बाळासाहेब क्षीरसागर यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले. सेवानिवृत्त झालेले विविध शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, गुणवंत शिक्षक आणि विविध परीक्षांमध्ये यश संपादन करणारे विद्यार्थी यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला.

# स्काऊट गाईडमुळे माणूस सर्व गुणसंपन्न होतो : प्रशांत गायकवाड

**निफाड (भ्रमर वार्ताहर) :–** जि. प. शिक्षण विभाग प्राथमिक, माध्यमिक तथा नाशिक भारत स्काऊटस आणि गाईड जिल्हा कार्यालय नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने कर्मवीर गणपत दादा मोरे महाविद्यालय निफाड येथे तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक, खासगी माध्यमिक, शासकीय व अनुदानित आश्रम शाळेतील इयत्ता सहावी ते नववीच्या स्काऊट गाईड विद्यार्थ्यांच्या एक दिवसीय संघनायक शिबिराचे आयोजन करण्यात आले.



या संघनायक शिबिरामध्ये उपस्थित १८६ स्काऊट गाईड विद्यार्थ्यांना स्काऊट गाईड अभ्यासक्रमांतर्गत ध्वजारोहण, स्काऊट गाईडचा इतिहास प्रार्थना, नियम, वचन, झेंडागीत, गाठींचे प्रकार व प्रथमोपचार, जिल्हा मेळावा, राज्य पुरस्कार राष्ट्रपती पुरस्कार, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील विविध कार्यक्रम आदींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी निफाड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी प्रशांत गायकवाड, कर्मवीर गणपत दादा मोरे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या शिबिरात मार्गदर्शक म्हणून बद्रीनाथ रायते, जिल्हा संघटक स्काऊट श्रीनिवास मुरकुटे, जिल्हा संघटक गाईड कविता वाघ, शिबिर सहाय्यक मनोज तुसे आदी उपस्थित होते. उपस्थित स्काऊट गाईड विद्यार्थ्यांना ललिता पवार यांच्या हस्ते सहभागाचे प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

# पंजाबच्या पूरग्रस्तांना ४० टन कांद्याचे योगदान

**लासलगाव (भ्रमर वार्ताहर) :–** पंजाबमध्ये आलेल्या भीषण पुरामुळे हजारो कुटुंबांचे हाल होत असताना, नाशिक जिल्ह्यातील लासलगाव येथील कांदा व्यापाऱ्यांनी मदतीचा हात पुढे करून समाजसेवेचा आदर्श घालून दिला आहे. तब्बल ४० टन कांदा, ज्याची बाजारमूल्य पाच लाख रुपयांहून अधिक आहे, हा थेट पंजाबमधील पूरग्रस्तांना रवाना करण्यात आला आहे.



लासलगावमधून रवाना झालेला हा कांद्याचा ट्रक (क्र. एमएच१९ झेड ५६४७) तब्बल १६०० किलोमीटरचा प्रवास करत पंजाबला पोहोचणार आहे. व्यापाऱ्यांच्या गोडाऊनमधून ट्रकवर कांदा चढवण्यासाठी स्थानिक वाहनचालकांनीही स्वखर्चाने मदत केली. विशेष म्हणजे, या वाहतुकीचा दोन ते अडीच लाख रुपयांचा खर्च मनमाड येथील गुरुद्वारा गुप्तसर आणि पंजाबी शीख बांधवांनी उचलला आहे. या उपक्रमामुळे महाराष्ट्रव पंजाब या दोन राज्यांमधील सामाजिक ऐक्य आणि 'मानवतेचे नाते' दृढ झाले आहे. व्यापारी व शीख बांधवांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे संकटग्रस्तांना दिलासा मिळणार असून, लासलगाव कांदा व्यापाऱ्यांचा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरला आहे.

# लायन्स क्लब ऑफ नाशिकतर्फे गुरुजनांचा सन्मान

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** लायन्स क्लब ऑफ नाशिक सेवा कार्यामधील ६४ व्या वर्षांत पदार्पण करीत आहे. शिक्षक दिनानिमित्त शिक्षक सन्मान सोहळा काल पंडित कॉलनी येथील लायन्स हॉल येथे झाला.

या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलताना प्रा. डॉ. वृंदा भार्गवे म्हणाल्या, की राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशात स्मार्ट क्लासरुमपेक्षा स्मार्ट शिक्षकांची अधिक गरज असल्याचे नुकतेच सांगितले. आजच्या शिक्षकांपुढे अनेक आव्हाने आहेत. विद्यार्थ्यांना बंदिशाळा न वाटता संधीशाळा वाटली पाहिजे. त्यासाठी त्यांना विविध संधी मिळवून देण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करावे. रिलमास्टर होण्याऐवजी रोलमास्टर बनावे. उत्तम माणूस घडवावा.

यावेळी माजी प्रांतपाल विनोद कपूर यांची विशेष उपस्थिती लाभली. यावेळी ३० वर्षांपेक्षा जास्त काळ ज्ञानदानाचे कार्य करीत असणाऱ्या पाच गुरुजनांचा सन्मान करण्यात आला. प्रारंभी अध्यक्ष किशोर केदार यांनी स्वागत तर ज्येष्ठ सभासद व समन्वयक सुहास शुक्ल यांनी प्रास्ताविक केले. पंडित मोरे यांनी लायन्स ध्वजाची शपथ सर्वांना दिली. सत्कारार्थी शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जान्हवी आपटे यांनी केले. सचिव प्रफुल्लचंद्र कुमावत यांनी आभार मानले.

या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. डी. डी. लोखंडे (शिक्षणाधिकारी, म. वि. प्र.समाज, शैक्षणिक संस्था), आश्लेषा ढोकपाटील (शिक्षिका, आदर्श इंग्लिश मीडियम स्कूल), विद्या देशपांडे, (कथक नृत्यालंकार, संचालिका अभिजात नृत्य नाट्यसंगीत ॲकॅडमी), प्राचार्य मानसी देशमुख (सचिव, दांडेकर टेक्निकल इन्स्टिट्यूट), सरोज शिंदे (पर्यवेक्षक ए. पी. पटेल हायस्कूल) यांना पुष्पगुच्छ, स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

# मनपा करणार ४५ शिक्षकांचे समायोजन

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** काही दिवसांपूर्वी नाशिक महापालिकेतील शिक्षण विभागात झालेल्या शिक्षक समायोजन प्रक्रिया कमालीची वादग्रस्त ठरली होती. आ. किशोर दराडे यांनी याप्रकरणी भ्रष्टाचाराचे आरोप केले होते. त्यानंतर ही प्रक्रिया थेट रद्द करून परजिल्ह्यातून आलेल्या ४८ शिक्षकांना कार्यमुक्त करण्यात आले होते. दरम्यान या शिक्षकांना कार्यमुक्त केल्यावर त्यांच्या रिक्त पदावर मनपा अंतर्गत शिक्षकांच्या बदल्या केल्या जाणार आहे.

मनपात रिक्त झालेल्या विविध शाळांमधील ४२ शिक्षकांचे समायोजन प्रक्रिया शिक्षण विभागातर्फेकालपासून सुरू करण्यात आली आहे. यात हिंदी माध्यमातील २६ शिक्षक, तर मराठी माध्यमाच्या १९ शिक्षक, असे ४५ जणांचे समायोजन करण्यात येणार आहे. पवित्र पोर्टलनुसार भरतीचे आदेश आले, तर संबंधित शिक्षकांना दुसऱ्या जागी शिफ्ट करण्यात येणार आहे. महापालिकेच्या हिंदी व मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून जागा रिक्त होत्या. त्यामुळे पटसंख्या वाढूनही बऱ्याच शाळांमध्ये शिक्षक नसल्याने अडचणी निर्माण झाल्या होत्या. या नवीन शिक्षकांना वेगवेगळ्या शाळांमध्ये समाविष्ट केल्याने आता शाळांचे कामकाजही सुरळीत होण्यास मदत होणार असल्याचे मनपाच्या शिक्षणाधिकारी डॉ. मीता चौधरी यांनी सांगितले.

# राष्ट्रीय दर्पण शिक्षक गौरव पुरस्कार प्रतीक वडनेरे यांना प्रदान



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघाच्या (नाशिक) वतीने शिक्षक दिनानिमित्त राष्ट्रीय दर्पण शिक्षक गौरव पुरस्कारांची घोषणा नुकतीच राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. महेंद्र देशपांडे यांनी केली होती. यात नाशिक येथील प्रतीक वडनेरे यांचा समावेश होता. येथे मान्यवरांच्या उपस्थितीत प्रतीक वडनेरे यांना राष्ट्रीय दर्पण शिक्षक गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन प्रतीक वडनेरे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्रतीक वडनेरे यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# तन्मय नांदुर्डीकर याचे सेट परीक्षेत यश

**येवला (भ्रमर वार्ताहर) :–** यंदाच्या राज्यस्तरीय पात्रता परीक्षामध्ये तन्मय नांदुर्डीकर याने उल्लेखनीय यश संपादन करून येवलेकरांचा व पालकांचा अभिमान वाढविला आहे. या परीक्षेत भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांनी परिश्रम, चिकाटी आणि सातत्य यांची सांगड घालत उज्ज्वल यश मिळविले.

यावर्षी एकूण साधारणपणे ९०३६६ विद्यार्थ्यांनी सेट परीक्षा दिली होती त्यात अवघे ६०५० विद्यार्थी सदर परीक्षा उत्तीर्ण झाले व निकाल हा ६.६९ टक्के लागून विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. त्यात तन्मय याने २०८ गुण मिळवून उत्तीर्णतेचा मान मिळविला. सेट परीक्षा ही राज्यातील उच्च शिक्षणासाठी महत्त्वाची पायरी मानली जाते. या परीक्षेत यशस्वी होणे म्हणजे विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी भक्कम पाया मिळणे होय. त्यामुळे या विद्यार्थ्यांचे यश हे केवळ वैयक्तिक नाही, तर संपूर्ण शाळा व समाजासाठी प्रेरणादायी ठरणारे आहे. सध्या तो चंद्रशेखर आगाशे कॉलेज येथे बी. पी. एड. पदवी पूर्ण करून एम. पी. एड. याचे शिक्षण पूर्ण करत आहे.

तन्मय याचे प्राथमिक शिक्षण हे डिपॉल इंग्लिश मीडियम स्कूल व उच्च शिक्षण हे कला व वाणिज्य महाविद्यालय येवला येथे झालेले आहे, तसेच तो येवल्यातील कला व वाणिज्य महाविद्यालय येथील सेवानिवृत्त क्रीडा संचालक शिरीष नांदुर्डीकर व शिक्षिका राजश्री फडके यांचा चिरंजीव आहे. त्याच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापक, जनता विद्यालयाचे प्राचार्य व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद, राजकीय, सामाजिक व क्रीडा क्षेत्रातून विविध मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

## तरुणावर कोयत्याने वार

**नाशिकरोड (भ्रमर प्रतिनिधी) :–** देवळाली कॅम्प परिसरातील बुखारी हॉटेलजवळ प्रेम थोरात आणि त्याच्या मित्राने मागील भांडणाची कुरापत काढून झार्फकामगार आदित्य भालेरावसह मध्यस्थी करणाऱ्या सागर याच्या डोक्यावर आणि हातावर कोत्याने वार केले. पोलीस उपनिरीक्षकएस. व्ही. ढुकरे या गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

# लासलगाव येथे ईद ए मिलादचा जुलूस उत्साहात



**लासलगाव (भ्रमर वार्ताहर) :–** इस्लाम धर्माचे संस्थापक हजरत मोहम्मद पैगंबर साहेब यांचा जन्मोत्सव अर्थात ईद–ए–मिलाद निमित्ताने काढण्यात आलेल्या जुलूस मध्ये लहान मुलांसह मुस्लिम बांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

लासलगाव येथील मुस्लिम बांधवांनी गणेश विसर्जनानंतर काल सोमवारी ईद–ए–मिलादचा जुलूस काढण्याचा निर्णय घेतला होता. शहरातील जामा मशीद येथून सकाळी नऊ वाजता जुलूसला प्रारंभ करण्यात येऊन शहरातील विविध भागांतून जुलूस काढण्यात आला.

जुलूस चा समारोप शहरातील ईदगाह मैदानात करण्यात आला. या वेळी जामा मशिदीचे शहर ए इमाम मौलाना मुबारक हुसेन यांनी पवित्र कुरआण 'आयात'चे वाचन करून फातेहा पठण केले.

यावेळी मौलाना फारुख अश्रफी, हाफिज तोफिक शेख व मौलाना अख्तर रजा उपस्थित होते. यावेळी जामा मशीद मुस्लिम पंच कमिटीच्या वतीने सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी लंगर शरीफचे आयोजन करण्यात आले होते. सर्व मुस्लिम बांधवांनी लंगर शरीफ चा अस्वाद घेतला.

या प्रसंगी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक जयदत्त होळकर, उपसरपंच रामनाथ शेजवळ, निफाडचे उपविभागीय पोलीस अधिकारी के. के. पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे, गुणवंत होळकर, संतोष ब्रह्मेचा, सचिन होळकर, शिवा सुरासे, प्रकाश पाटील, डॉ. विकास चांदर, डॉ. अमोल शेजवळ, बालेश जाधव, संतोष पानगव्हाणे, गोकुळ पाटील, शरद लोहकरे, टाकळी ग्रामपंचायत सदस्य केशवराव जाधव, सचिन शिकलकर, सागर अहिरे आदींनी जु मुस्लिम बांधवांना ईद निमित्त शुभेच्छा दिल्या.

निफाडचे उपविभागीय पोलीस अधिकारी के. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली लासलगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे, पोलीस उपनिरीक्षक किरण साळुंखे, पोलीस उपनिरीक्षक मोहन पाटील, गोपनीय पोलीस कर्मचारी मंगेश डोंगरे, सुजय बारगळ व पोलीस कर्मचाऱ्यांनी चोख पोलीस बंदोबस्त तैनात केला होता.

# डॉ. आंबेडकर मागासवर्गीय मुलींच्या वसतिगृहात ऑनलाईन प्रवेश सुरू

**नाशिक (जिमाका वृत्तसेवा) :–** सामाजिक न्याय विभागांतर्गत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह (जुने) नाशिक व डॉ. बाबासाहेब आंबेडकर १२५ जयंती मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, त्र्यंबकेश्वर, नाशिक या दोन्ही वसतिगृहांत सन २०२५–२६ या शैक्षणिक वर्षासाठी व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनींसाठी वसतिगृह प्रवेश सुरू आहे. इच्छुक विद्यार्थिनींनी https://hmas.mahait.org या पोर्टलवर १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन वसतिगृहाच्या गृहपाल एस. आर. रेड्डी यांनी प्रसिद्धिपत्रकान्वये केले आहे. ऑनलाईन अर्ज सादर करताना विद्यार्थिनींनी गणपत्रक (मागील वर्षाचे), जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला (२०२४–२५), बोनाफाईड प्रमाणपत्र, आधार कार्ड, शाळा सोडल्याचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र, गॅप प्रमाणपत्र (नोंदणीकृत) आदी कागदपत्रे आवश्यक आहेत. विद्यार्थिनींनी ऑनलाईन भरलेले अर्ज पोर्टलवरून डाऊनलोड करून त्यांची प्रिंट काढून ठेवणे आवश्यक आहे. प्रवेशाबाबत अधिक माहितीसाठी ०२५३–४०६२७९१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही प्रसिद्धिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

## सरूबाई सोनवणे यांचे निधन

**देवळा (भ्रमर वार्ताहर) :–**



तालुक्यातील वार्शी येथील सरूबाई राजाराम सोनवणे (वय ९३) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, पाच मुली, सुना व नातवंडे असा परिवार आहे, येथील उद्योजक भाऊसाहेब सोनवणे व वार्शी विकास सोसायटीचे माजी चेअरमन नंदन सोनवणे यांच्या मातोश्री, तर देवळा कृउबा समितीचे संचालक विजय सोनवणे यांच्या त्या काकू होत.

# आठव्या मैलाजवळ मोटारसायकल अपघातात एक जण गंभीर जखमी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** मुंबईकडून नाशिककडे जाणारी मोटारसायकल महामार्गावरील एका खड्ड्यात जाऊन पडली.

त्यात मोटारसायकलस्वार लखन काशीनाथ लहांगे (वय ४६, रा लहांगेवाडी) याच्या तोंडाला व हाता पायास गंभीर मार लागला.

घटनेचे वृत्त समजताच जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य संस्थानच्या ॲम्ब्युलन्सचे चालक निवृत्ती गुंड यांनी घटनास्थळी जाऊन अपघातग्रस्त लखन काशीनाथ लहांगे यास तत्काळ नाशिक जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

महामार्गावरील खड्डे, तसेच गोंदे ते पिंप्री सदोदरम्यान सुरू असलेल्या कामामुळे नेहमीच अपघात होत असून, या अपघातांमध्ये अनेकांना आपले जीव गमवावे लागतात, तर अनेक जण गंभीर जखमी होण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण विभाग याकडे गांभीर्याने पाहत नसून वाहनधारकांमध्ये संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.

दरम्यान, संबंधित यंत्रणेने महामार्गावरील खड्डे तत्काळ बुजवावेत, तसेच गोंदेपासून सुरू असलेल्या महामार्गाच्या कामात दिरंगाई न करता आवश्यक ठिकाणी सूचना फलक तसेच सिग्नल कार्यान्वित करण्याची मागणी होत आहे.

# शासकीय वसतिगृहातील रिक्त जागांवर प्रवेश प्रक्रिया सुरू

**नाशिक (जिमाका वृत्तसेवा) :–** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत असलेल्या शासकीय वसतिगृहात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विजाभज, इमाव, विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थांसाठी सन २०२५–२६ या शैक्षणिक वर्षासाठी व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी रिक्त जागांवर प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी https://hmas.mahait.org या पोर्टलवर दि. १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त देवीदास नांदगावकर यांनी प्रसिद्धिपत्रकान्वये केले आहे.

एकूण २८४ रिक्त जागांवर प्रवेश देण्यात येणार आहेत, तसेच या वर्षापासून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेण्यासाठी वसतिगृहाचा अर्ज करणे आवश्यक आहे. वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या व योजनेच्या निकषाप्रमाणे पात्र असलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांनाच स्वाधार योजनेचा लाभ अनुज्ञेय असल्याने इच्छुक विद्यार्थ्यांनी वसतिगृह प्रवेश अर्ज भरावा. याबाबत अधिक माहितीसाठी संबंधित गृहप्रमुख, गृहपाल व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, नाशिक, नासर्डी पूल, नाशिक येथे संपर्क करावा, असेही प्रसिद्धिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.


## जाहीर निवेदन

खाली लिहिल्याप्रमाणे जाहीर निवेदन. सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, **कै. श्री. शांताराम निवृत्ती जाधव,** रा. फ्लॅट नं. २, लक्ष्मणरेखा अपार्टमेंट, कॉलेज रोड, पाटील लेन नंबर १, लक्ष्मीनगर, कॉलेज रोड, नाशिक ४२२००५ येथील रहिवासी असून ते जिल्हा परिषद नाशिक येथे उपअभियंता म्हणून सेवानिवृत्त झाले होते. ते दिनांक १५/०७/२०२४ रोजी मयत झालेले असून, त्यांना खालील प्रमाणे कायदेशीर वारस आहे.

| अ. क्र. | वारसांचे नाव | मयताशी नाते | वय |
|---|---|---|---|
| १ | सुवर्णा शांताराम जाधव | पत्नी | ५४ |
| २ | प्रियंका शांताराम जाधव | मुलगी | ३५ |
| ३ | निखिलकुमार शांताराम जाधव | मुलगा | ३२ |
| ४ | रुद्र शांताराम जाधव | मुलगा | २४ |

हे वारस असून या व्यतिरिक्त दुसरे कोणीही वारस नाही. तरी कुणास काही हरकत असल्यास त्यांनी मा. तहसीलदार साहेब, नाशिक यांचेकडे ७ दिवसांचे आत लेखी खुलासा करावा; अन्यथा मा. तहसीलदार नाशिक यांचेकडून वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर प्रमाणपत्र हे शासकीय पेन्शन, फंड यासाठी देण्यात येणार आहे.

(शिक्का) सही/–
तहसीलदार, नाशिक

**TAKEKAR SHIKSHA SANKUL**
**Sant Upasani Maharaj Bahuuddeshiya Seva bhavi Sanstha**
**Hon. Shri ShankarraoTakekar Institute of Pharmaceutical Sciences & Research, Nashik**
Nashik Ozar Highway, Garware Stop, Near Bafna Ware House, Nashik
(PCI approved, DBATU Lonere and DTE approved)
**DTE Choice Code:553882310**
**DIRECT SECOND YEAR B. PHARMACY**
Courses for vacant seats after CAP Round IV (Against CAP)
And Institute Level Seats for A.Y. 2025-2026
**ELIGIBILITY: Diploma Passed**

| Sr. No. | Schedule | Date |
|---|---|---|
| 1. | Application Submission to Institute | 07/09/2025 -12/09/2025 |
| 2. | Reporting to the Institute | 12/09/2025 |

**Contact :8208793308**

## गहाण घ्यावयाच्या मिळकतीचे (टायटल व्हेरिफिकेशन नोटीस)

तमाम लोकांना या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक पैकी नाशिक मनपा हद्दीतील मौजे नाशिक शहर ३ या गावचे शिवारातील स्थावर मिळकत यांच्या मालकीची तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक पैकी नाशिक मनपा हद्दीतील मौजे म्हसरूळ मधील मिळकत यांसी सर्व्हे नं. १३६/१/अ/प्लॉट न. प्लॉट नं. १६० क्षेत्र ५५८.०० चौमी. प्लॉट नं. १६१ क्षेत्र ५७७.०० चौमी प्लॉट नं. १६७ क्षेत्र २८१.५२ चौमी. प्लॉट नं. १६८ क्षेत्र २६७.८४ चौमी. प्लॉट नं. १६९ क्षेत्र २६७.८४ चौमी असे एकूण क्षेत्र १९५२.२० चौ. मी. मिळकत सौ. दक्षा निरव पजवाणी रा. नाशिक यांचे खरेदी मालकीची स्थावर मिळकत तारण देऊन श्री. दिलीप अमृतलाल पजवाणी व इतर रा. नाशिक यांनी सिटीझन नागरी सहकारी पतसंस्थेकडे कर्ज मागणी अर्ज केलेला आहे. सदर मिळकत संमतीदार यांचे मालकीची व कब्जे वहीवाटीतील आहे. यांनी ही मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे आमचे पक्षकार सिटीझन नागरी सहकारी पतसंस्थेस खात्रीने सांगून सदर मिळकतीचा व्यवहार म्हणजेच गहाण ठेवण्यास त्यांनी आमचे बरोबर गहाणखत लिहून देण्याचे निश्चित केले आहे. सदर मिळकत अन्य कोठेही गहाण, दान, लिन, लिज, अन्नवस्त्र, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, साठेखत, विसारपावती, मुखत्यारपत्र, उसनवार व्यवहार, सोसायटी, बँक अथवा अन्य वित्तीय संस्थेचा बोजा नाही अशी निर्वेध मालकीची असल्याचे सांगितले असून, त्या मिळकतीच्या टायटल व्हेरीफिकेशन कामी सदर नोटीस प्रसिद्ध केली आहे.

सदर मिळकत अन्य कोणत्याही जड जोखमीत गुंतविलेली असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्या दिवसापासून ७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर साक्षांकित प्रतीनिशी लेखी हरकत नोंदवावी. तदनंतर कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास ती आमचे पक्षकार सिटीझन नागरी सहकारी पतसंस्थेवर बंधनकारक राहणार नाही. तसेच परस्पर वर्तमान पत्रांत घेतलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाही. कळावे, ही टायटल व्हेरीफिकेशन नोटीस.

दि. १०.०९.२०२५

मा. चेअरमन सो.
सिटीझन नागरी सहकारी पतसंस्था मर्या. गंगापूर रोड, नाशिक ४२२००५,
फोन नं. २२३२७२२

(शिक्का)

आमच्या तर्फे
ॲड. तुषार एन. कुलकर्णी
शॉप नं. जीएफ २, ठक्कर बाजार, नवीन सीबीएस, ता. जि. नाशिक.
मोबा. ९४२३९६५५५०

# विविध मागण्यांसाठी उद्या मनसे-उद्धवसेनेचा मोर्चा

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- हनी ट्रॅपच्या चौकशीसह विविध मागण्यांसाठी मनसे व उद्धवसेनेच्यावतीने उद्या कालिदास कला मंदिर येथील बी. डी. भालेकर मैदान येथून सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयावर संयुक्त जनआक्रोश मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती मनसे प्रदेश सरचिटणीस दिनकर पाटील, प्रदेश उपाध्यक्ष सलीम शेख, उद्धवसेनेचे उपनेते दत्ता गायकवाड, माजी आमदार वसंत गिते यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत दिली.



शहरात व जिल्ह्यात अनेक दिवसांपासून एमडी ड्रग्स, अमली पदार्थ, अवैध धंदे मोठ्या प्रमाणात सुरू आहे व कोयता गँग यांची दहशत यामुळे गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे, कर्जमाफी, हमीभाव, वीजपुरवठा या आश्वासनांची फसवणूक, स्मार्ट सिटी, पाणीपुरवठा, रस्ते कामांत कोट्यवधींचे घोटाळे; शहराच्या रस्त्यातील खड्ड्यांकडे दुर्लक्ष, स्मार्ट मीटर आणि खासगीकरणाच्या नावाखाली घराघरात लूट, नागरिकांवर अधिक बिलांचा भार, कुंभमेळ्यासाठी तयारी शून्य, बाहेरच्या कंत्राटदारांना प्राधान्य, स्थानिकांना वंचित ठेवण्यात आले आहे. कोट्यवधी रुपये खर्चूनही प्रकल्प बंद असून गोदावरीसह नद्यांचे प्रदूषण वाढले, आयटी पार्क व मोठे प्रकल्प शहरात येत नसल्याचे निवेदनात म्हटले आहे.

यावेळी रतनकुमार इचम, जयंत दिंडे, डी. जी. सूर्यवंशी, अंकुश पवार, सुदाम कोंबडे, प्रथमेश गिते, सुजाता डेरे, नामदेव पाटील, संदीप किरवे, असलम मणियार, बंटी कोरडे उपस्थित होते. मनसे व उद्धवसेनेच्यावतीने मोर्चासाठी जिल्ह्यात ठिकठिकाणी मेळावे, बैठका घेण्यात आल्या असून मोर्चासाठी सुमारे २५ हजार मोर्चेकरी सहभागी होतील, असे दोन्ही पक्षांच्यावतीने सांगण्यात आले. दोन्ही पक्ष एकत्र येत प्रथमच मोठा मोर्चा काढण्यात येत असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

# गव्हर्निंग कौन्सिल सदस्यपदी डॉ. नारायण देवगावंकर यांची निवड

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :-



रिसर्च सोसायटी फॉर द स्टडी ऑफ डायबिटीज इन इंडिया (आरएसएसडीआय) देशातील या सर्वात मोठ्या मधुमेह तज्ज्ञांच्या संघटनेच्या गव्हर्निंग कौन्सिलच्या सदस्यपदी सुप्रसिद्ध मधुमेह तज्ज्ञ व देवगांवकर हॉस्पिटलचे प्रमुख डॉ. नारायण देवगांवकर यांची निवड झाली आहे.

नाशिकमधून प्रथमच राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्यपदावर नाशिकच्या डॉक्टरांना स्थान मिळाले असून, सदस्यपदी निवड झालेले ते महाराष्ट्रातील एकमेव डॉक्टर आहेत. ही निवड २०२६ ते २०२९ अशा तीन वर्षांसाठी असेल.

मधुमेह तज्ज्ञ डॉ. नारायण देवगांवकर यांनी यापूर्वी नाशिक जिल्हापातळीवर तसेच राज्य-पातळीवर वेगवेगळ्या महत्त्वाच्या पदांवर जबाबदारी यशस्वीरित्या सांभाळली आहे. आरएसएसडीआय महाराष्ट्र शाखेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी त्यांनी यशस्वीरित्या सांभाळली आहे. तसेच महाराष्ट्र फिजिशियन असोसिएशनचे नेतृत्व त्यांनी केले आहे. आपल्या कार्यकाळात विविध आंतरराष्ट्रीय परीषदांचे आयोजन करुन सदस्य डॉक्टरांना मार्गदर्शन उपलब्ध करुन देण्यात त्यांचा पुढाकार राहिला आहे. आरएसएसडीआय या राष्ट्रीय पातळीवर कार्यरत संघटनेच्या कार्यकारणी निवडीसाठी देशभरातील सदस्य डॉक्टरांनी मतदान केले. एनएसडीए या टेक्नॉलॉजीवर आधारित व्यासपीठावरुन ऑनलाइन माध्यमातून सदस्यांनी मतदान केले. ही मतदानाची प्रक्रिया १ सप्टेंबर ते ८ सप्टेंबर या कालावधीत पार पडली. यानंतर निकाल जाहीर करण्यात आला. यामध्ये कार्यकारिणी सदस्यपदाच्या ६ जागांसाठी एकूण १२ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. यामधून नाशिकच्या डॉ.नारायण देवगांवकर यांनी निवडणूक जिंकताना राष्ट्रीय पातळीवर यश मिळविले आहे. आरएसएसडीआय या संस्थेच्या माध्यमातून संशोधन कार्य होत असते. संस्थेचे १४ हजार सदस्य देशभरात कार्यरत आहेत. या यशाबद्दल डॉ. नारायण देवगांवकर म्हणाले, आरएसएसडीआय संघटना मधुमेह तज्ज्ञांची सर्वात जुनी व सर्वात मोठी संघटना आहे. या प्रतिष्ठीत संस्थेच्या विविध पातळ्यांवर काम करताना योगदान दिले आहे. कार्यकारिणी सदस्य म्हणून नाशिकला प्रथमच बहुमान मिळाला आहे.

निवडणुकीतून झालेली निवड सार्थ ठरवणार आहे. ३ वर्षांच्या कार्यकाळात विविध उपक्रम राबविण्याचा मानस डॉ. देवगावकर यांनी व्यक्त केला.

## कैद्यावर जीवघेणा हल्ला

**पुणे (भ्रमर वृत्तसेवा)**:- कुख्यात गँगस्टर प्रवीण महाजनचा नवा कारनामा समोर आला आहे. नागपूर मध्यवर्ती कारागृहात एका किरकोळ वादातून त्याने दुसऱ्या कैद्यावर जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेने तुरुंगात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## आजचे वाढदिवस



सचिन मराठे
माजी महानगरप्रमुख, शिवसेना



ॲड. संदीप गुळवे
मा. संचालक जिल्हा बँक



तुषार चव्हाण
उद्योजक



नरेंद्र खैरनार
पत्रकार



सौ. ज्योती कवर
चिटणीस, भाजपा

# मनपाच्या स्पेलिंग बी उपक्रमाचे उद्घाटन

## अंबडच्या मनपा शाळा क्र. ७८ मध्ये उपक्रम

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- नाशिक महानगरपालिका आणि एज्युकेशनल कन्सेप्ट्स इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने मनपाच्या १०० शाळांमध्ये स्पेलिंग बी उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला आहे.

मनपा शिक्षण विभागाच्या अंबडगाव येथील आयएसओ मानांकित सावित्रीबाई फुले मनपा शाळा क्रमांक ७८ (मुली) या शाळेत नाशिक महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त करिश्मा नायर व शिक्षणाधिकारी डॉ. मिता चौधरी यांच्या हस्ते काल स्पेलिंग बी उपक्रमाचे प्रातिनिधिक स्वरूपात उद्घाटन झाले.

अतिरिक्त आयुक्त करिश्मा नायर यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. नाशिक महानगर पालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या इंग्रजी विषयातील प्राविण्यासाठी स्पेलिंग बी हा उपक्रम सहाय्यभूत ठरणार असून या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या इंग्रजीच्या भाषिक संपत्तीमध्ये वाढ होईल.

स्पेलिंग बीसारख्या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो आणि त्यांना शिक्षणाची गोडी लागते. केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे, तर अशा स्पर्धांमधून मिळणारे अनुभव विद्यार्थ्यांना भविष्यात यशस्वी होण्यासाठी मदत करतात, असे त्या म्हणाल्या. कार्यक्रमात विविध प्रकारचे स्पेलिंग विद्यार्थ्यांनी न चुकता सांगितले. त्याबद्दल अतिरिक्त आयुक्तांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व त्यांना प्रोत्साहन दिले.

हा स्पेलिंग बी उपक्रम नाशिक महानगरपालिकेच्या १०० शाळांमध्येही राबवला जाणार असून यामुळे मनपा शाळांमधील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. या कार्यक्रम प्रसंगी स्पेलिंग बी या उपक्रमासाठी मकरंद सावरकर विंझिट टेक्नॉलॉजी व एज्युकेशनल कन्सेप्ट इंडिया या संस्थेचे ऋतू मुथा, जूट व त्यांची टीम तसेच अंबडच्या आयडीबीआय बँकेचे शाखाधिकारी चेतन पन्हाळे, क्षेत्रीय अधिकारी आशिष सिंग व रूपाली निकम तसेच प्रवीण बांगर, बाळासाहेब मुंडे, अक्षदा अढांगळे, प्रल्हाद हंकारे आदी उपस्थित होते.



### पी.ए.साऊंड सिस्टिम सर्व वर्गांसाठी उपलब्ध

कार्यक्रम प्रसंगी मनपा शाळा क्रमांक ७८, शाळेतील आयडीबीआय बँक या बँकेच्या सीएसआर फंडामधून शाळेसाठी एक लाख सोळा हजार रूपयांची पी.ए.साऊंड सिस्टिम सर्व वर्गांसाठी उपलब्ध करून दिली. त्याचेही उद्घाटन अतिरिक्त आयुक्तांच्या हस्ते केले. यावेळी अतिरिक्त आयुक्त करिश्मा नायर (भा.प्र.से.) यांचा शाळेच्या वतीने शिक्षणाधिकारी डॉ.मिता चौधरी यांनी सत्कार केला.

मनपा शाळा क्रमांक ७८ च्या मुख्याध्यापिका निलम मोरे, मनपा हायस्कूलचे मुख्याध्यापक अरुण दातीर, मनपा शाळा क्रमांक ७७ च्या मुख्याध्यापिका संगीता निकम आदी व्यासपीठावर उपस्थित होते. सूत्रसंचालन राजेश दाभाडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ज्येष्ठ शिक्षक विक्रम नागरे, सतीश बच्छाव, माणिक मोरे, नितीन वाजे, दिपाली चंद्रात्रे, रंजना मांडे, सुनिता दशपुते आदींसह शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# नेपाळमध्ये अडकले शहरातील चार पर्यटक

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- नेपाळमध्ये नाशिक शहरातील चार नागरिक अडकल्याची माहिती समोर आली आहे. अंबड येथील चार पर्यटक दि. ७ सप्टेंबर रोजी काठमांडूला गेले होते.

यात मंगला गोसावी, रामगिरी गोसावी, सुनीता आहेर, भास्कर आहेर या चार जणांचा समावेश आहे. हे चारही पर्यटक आता पोखराजवळील एका हॉटेलमध्ये असून त्यांचे १२ सप्टेंबरचे काठमांडू ते मुंबई असे परतीचे तिकीट आहे. मात्र बाहेरील अस्थिर परिस्थितीमुळे ते अडकून पडले आहेत. त्यांना मायदेशी परत येण्यासाठी मदत मिळावी, अशी मागणी त्यांचे चिरंजीव अनिल गोसावी यांनी नियंत्रण कक्षाकडे केली आहे.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी श्रीकृष्ण देशपांडे यांनी राज्य आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्षास नाशिक शहरातील अडकलेल्या नागरिकांची माहिती दिली असून शासनाकडून अडकलेल्या नागरिकांना परत आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहे. तसेच नाशिक जिल्ह्यातील नागरिक पर्यटनासाठी काठमांडू येथे गेले असल्यास जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन देशपांडे यांनी केले आहे.

नेपाळ सरकारने सोशल मिडीयावर बंदी घातल्यानंतर तेथील तरूण वर्गाकडून हिंसक आंदोलन करण्यात आले. यामुळे नेपाळमध्ये अस्थिरता निर्माण झाली आहे. यात भारतातील अनेक नागरिक पर्यटनासाठी नेपाळमध्ये गेले होते. तेथील अस्थिर परिस्थितीमुळे ते तेथे अडकून पडले आहेत.

दरम्यान , नेपाळ परराष्ट्र मंत्रालयाने विविध कारणांसाठी नेपाळमध्ये अडकलेल्या सर्व परदेशी नागरिकांना नेपाळ आमशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. परदेशी नागरिकांना हॉटेल्स, पर्यटन उद्योजक आणि इतर संबंधित संस्थांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले असून आवश्यकतेनुसार त्यांच्या मदतीची व्यवस्था नेपाळ परराष्ट्र मंत्रालयाद्वारे करण्यात येणार आहे.

# भारनियमन रद्द करण्यासाठी आ. आहिरे यांची मुख्यमंत्र्याकडे मागणी

**नाशिकरोड (भ्रमर प्रतिनिधी)** :- मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेऊन देवळाली विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागामध्ये सुरू असलेल्या भारनियमनाच्या समस्येबाबत आ. सरोज आहिरे यांनी निवेदन दिले.



देवळाली विधानसभा मतदारसंघाच्या ग्रामीण भागात मागील काही महिन्यांपासून वीजपुरवठ्याबाबत मोठ्या अडचणी निर्माण झाल्या आहेत. विशेषतः शेतीसाठी आवश्यक असलेली वीज वेळेवर मिळत नसल्याने शेतकरी वर्गाला आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. पिकांना योग्य वेळी पाणी न मिळाल्याने उत्पादन घटत असून त्याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या उपजीविकेवर होत आहे. तसेच सामान्य नागरिकांनाही अडथळे, कामकाज ठप्प होणे, शिक्षण, व्यवसाय यांसारख्या क्षेत्रांवर याचा परिणाम जाणवत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. या समस्येचा गांभीर्याने विचार करून ग्रामीण भागातील वीजभारनियमन तत्काळ कमी करण्याची मागणी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे करण्यात आली. भारनियमनामुळे निर्माण झालेली असुविधा लक्षात घेऊन प्रशासनाने लवकरच योग्य उपाययोजना करावी, अशी अपेक्षा आ. सरोज आहिरे यांनी व्यक्त केली. यावेळी संबंधित क्षेत्रातील स्थानिक नागरिक आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवेदन स्वीकारून लवकरच सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिल्याची माहिती मिळाली आहे.

# जनसुरक्षा कायद्याविरोधात शिवसेना उबाठा गटाच्यावतीने निदर्शने

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- जनसुरक्षा कायदा रद्द करावा, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य संघर्ष समितीकडून निदर्शने केली जात आहे. या अनुषंगाने नाशिकमध्ये काल उबाठा पक्षाच्या वतीने निदर्शने करण्यात आली. शिवसेनेच्या पक्ष कार्यालयात शालीमार चौक येथे महायुती सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करत जनसामान्यांचे हक्क हिरावून घेतले जात आहे, असा आरोप करत संविधानाची पायमल्ली होऊ देणार नाही. यासाठी शिवसेना ठाकरे गट सामान्यांसाठी रस्त्यावर उतरेल आणि सरकार विरोधात आक्रोश पोचवेल, असे मत ठाकरे गटांच्या पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आले. या आंदोलनात शिवसेना उपनेते दत्ता गायकवाड, जिल्हाप्रमुख डी. जी. सूर्यवंशी, माजी आमदार वसंत गिते, शिवसेना महानगरप्रमुख प्रथमेश गिते, उपजिल्हाप्रमुख महेश बडवे, भैया




मणियार, दिलीप मोरे, सचिव मसूद जीलानी, भारतीय विद्यार्थी सेना जिल्हा संघटक वैभव ठाकरे, महिला आघाडी जिल्हा संघटक स्वाती पाटील, विधानसभा प्रमुख राहुल दराडे, सुभाष गायधनी, विधानसभा महानगर समन्वयक शैलेश सूर्यवंशी, युवा सेना विस्तारक प्रवीण चव्हाण, उपमहागर प्रमुख दत्ता दंडगव्हाळ, सुभाष शेजवळ, वीरेंद्र टिळे, ऋषी वर्मा, योगेश देशमुख, योगेश गाडेकर, गोरख वाघ, राजू गोतीसे, साबी सिंग, शिवसेना पदाधिकारी मधुकर हिंगमिरे, संपत जाधव, आकाश उगले, विनोद नूनसे, संजय पिंगळे, अशोक पारखे, नितीन जाधव, राकेश साळुंखे, राजु राठोड, वैभव ढिकले, सागर निगाळे, अमित कंटक, संजय गोसावी, विक्रांत थोरात, मंदार बर्वे, मयूर जुन्नरे, रणजीत हिंगमिरे, स्वप्निल शहाणे, सोनू कोथमिरे, महिला आघाडीच्या पदाधिकारी कीर्ती निरगुडे, फेमेदा रंगरेज, सुवर्ण काळुंगे, मनीषा हेकरे, रंजना थोरवे, शोभा पवार, श्रद्धा कोतवाल, ज्योती कुमावत, शारदा दोंदे, मंदा गवळी आदी पदाधिकारी सहभागी झाले होते.

## आरटीएलमुळे विद्युत उद्योगांच्या..............

**(पान १ वरून)** बंदराशीही नाशिक जोडले जाणार असल्याने ‘उद्योगाचे जंक्शन’ म्हणून नाशिकचा भविष्यात विकास होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

**उद्योजकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आरटीएल उपयुक्त-मनोहरलाल खट्टर**

ऊर्जा क्षेत्राचे प्राण असलेली ही प्रयोगशाळा असल्याचे नमूद करून केंद्रीय ऊर्जा मंत्री श्री. खट्टर म्हणाले, घरगुती आणि व्यावसायिक वापरासाठीची विद्युत उपकरणे सूक्ष्म तपासणीनंतर उपयोगात येतात. गुणवत्ता तपासणीच्या आधारे ऊर्जा क्षेत्रातील प्रत्येक उपकरण तयार केले जाते. अशा तपासणीसाठी आरटीएल महत्वाची असून ती पश्चिम भारतातील उद्योगांच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी उपयुक्त ठरेल. ही अत्याधुनिक प्रादेशिक चाचणी प्रयोगशाळा विज्ञान आणि अभियांत्रिकीचे उत्कृष्ट प्रतीक आहे. महाराष्ट्रात प्री-पेड स्मार्ट मीटरचा उपयोग सुरू झाल्याबद्दल राज्य शासनाचे अभिनंदन करून ते म्हणाले, स्मार्ट मीटरच्या उपयोग करणाऱ्यांसाठी वीज देयकात १० टक्के सुट देण्याचा राज्य शासनाचा निर्णयही स्तुत्य आणि इतर राज्यांना मार्गदर्शक आहे. ट्रान्सफॉर्मर, एनर्जी मीटर, स्मार्ट मीटर, ट्रान्सफॉर्मर ऑइल आणि इतर वीज उपकरणांचे उत्पादक येथे देण्यात येणाऱ्या प्रगत चाचणी आणि प्रमाणन सेवांचा लाभ घेऊ शकतील. भारत आणि दुबईमधील विद्युत वाहिन्या समुद्राखालून जात असल्याने त्यासाठीच्या वाहिन्यांचे परिक्षण आणि अणुऊर्जासाठीच्या वाहिन्यांचे परिक्षण महत्वाचे आहे. उद्योग विश्वाला विश्वास वाटेल असे परिक्षण येथे होईल, असा विश्वास श्री.खट्टर यांनी व्यक्त केला.

प्रास्ताविकात महासंचालक श्री.सिंग यांनी प्रकल्पाची माहिती दिली. ही प्रयोगशाळा विद्युत उपकरणांच्या उच्च गुणवत्तेसाठी विश्वसनीय आणि वेळेत सेवा प्रदान करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली. प्रारंभी मुख्यमंत्री श्री. फडणवीस, केंद्रीय ऊर्जा मंत्री श्री. खट्टर यांच्या हस्ते प्रयोगशाळेचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर त्यांनी प्रयोगशाळेची पाहणी करीत प्रयोगशाळेची माहिती घेतली. कार्यक्रमाला आमदार देवयानी फरांदे, राहुल आहेर, राहुल ढिकले, सरोज आहेर, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, विशेष पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, जिल्हाधिकारी जलज शर्मा, मनपा आयुक्त मनीषा खत्री, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी ओंकार पवार, जिल्हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, सीपीआरआयचे सहसंचालक के.सुर्यनारायण आदी उपस्थित होते.

**प्रादेशिक चाचणी प्रयोगशाळेचे दुसरे युनिट**

नागपूर येथील औष्णिक संशोधन केंद्रानंतर राज्यात सीपीआरआयने नाशिकमध्ये ही प्रयोगशाळा स्थापित केली आहे. देशाच्या पश्चिम भागातील उद्योगांच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने प्रदान केलेल्या १०० एकर जागेत ही विस्तारली आहे. ट्रान्सफॉर्मर, एनर्जी मीटर, स्मार्ट मीटर, ट्रान्सफॉर्मर ऑइल आणि इतर पॉवर उपकरणांचे उत्पादक येथे उपलब्ध करून देण्यात आलेल्या प्रगत चाचणी आणि प्रमाणन सेवांचा लाभ घेऊ शकतील.

इथे असलेल्या पायाभूत सुविधांमध्ये ऑनलाइन शॉर्ट सर्किट टेस्ट स्टेशन, एनर्जी मीटर टेस्ट लॅबोरेटरी, ट्रान्सफॉर्मर रूटीन टेस्ट सुविधा, तापमान वाढ चाचणी सुविधा, ८०० केव्ही ८० केजे इम्पल्स व्होल्टेज चाचणी सुविधा, ट्रान्सफॉर्मर ऑइल चाचणी सुविधेचा समावेश आहे.

**प्रयोगशाळेची ठळक वैशिष्ट्ये**

नाशिकमध्ये स्थित ही सुविधा भारताच्या पश्चिम भागातील उद्योग आणि उपयुक्त सेवा देण्यासाठी निर्माण केलेली आहे. ही प्रयोगशाळा भारत सरकारच्या आत्मनिर्भरच्या दृष्टिकोनाला पाठिंबा देते. स्वदेशी चाचणी आणि प्रमाणन क्षमता वाढवून भारत उत्पादकांसाठी चाचणी आणि प्रमाणन वेळ लक्षणीयरीत्या कमी केला जाईल. यामुळे जलद उत्पादन विकास आणि बाजारपेठ प्रवेशाला प्रोत्साहन मिळणार आहे. ही सुविधा आंतरराष्ट्रीय मानकांचे पालन करणार आहे. जागतिक स्तरावरील कामगिरी आणि विश्वासार्हता बेंचमार्क सुनिश्चित करणार आहे. उद्योग आणि संशोधन संस्थांमध्ये सहकार्य वाढवेल. तसेच वीज क्षेत्रातील उत्पादनांची गुणवत्ता वाढवेल.

**उपक्रमाचे महत्त्व**

आरटीएल नाशिकचे उद्घाटन भारताच्या वीज क्षेत्रातील पायाभूत सुविधा वाढविण्याच्या प्रयत्नांमध्ये एक महत्त्वाचा टप्पा आहे. ही सुविधा गुणवत्ता, सुरक्षितता सुनिश्चित करण्यात योगदान देईल आणि महत्त्वपूर्ण वीज उपकरणांची विश्वासार्हता, परदेशी चाचणी सेवांवरील अवलंबित्व कमी करण्यास मदत होईल. यामुळे औद्योगिक विकासाला गती मिळेल. नवोपक्रमाला चालना मिळेल आणि देशभरातील विजेच्या जाळ्याच्या विस्ताराला पाठिंबा मिळेल, अशी अपेक्षा आहे.

# दहशत माजवणाऱ्या टोळक्यावर भद्रकाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- भद्रकाली परिसरातील संतोषी माता चौक, मानूर रोड बेकायदेशीर जमाव जमवून दगडफेक व कोयत्याने वाहनांची तोडफोड करणाऱ्या टोळक्यावर भद्रकाली पोलीस ठाण्यात गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी सुभाष सहदेव पटेल (वय ४२, रा. फेमस बेकरी जवळ, मानूर रोड, नाशिक) यांच्या फिर्यादीवरून किशोर बाबुराव वाकोडे (रा. कोळीवाडा, भगवतीनगर, नाशिक) व त्याच्यासोबत असलेल्या ५ ते ६ साथीदारांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेवेळी आरोपी आणि त्याचे साथीदार यांनी फिर्यादी व परिसरातील रहिवाशांच्या वाहनांवर दगडफेक केली. तसेच हातात कोयते घेऊन शिवीगाळ करत आरडा ओरडा करून परिसरात दहशत निर्माण केली व नंतर पळ काढला. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

तपासादरम्यान यातील प्रमुख आरोपीवर याआधी अंबड, भद्रकाली व सरकारवाडा पोलीस ठाण्यांत गंभीर स्वरूपाचे ८ गुन्हे दाखल आहेत. त्यात खुनाचा प्रयत्न, चोरी, दरोडा, तोडफोड, बेकायदेशीर जमाव, शस्त्र बाळगणे असे गंभीर गुन्हे आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास भद्रकाली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राकेश चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि अशोक शेरमोळे व पोउपनि तोंडे करत आहेत.

# मालेगावमध्ये घुसखोरी केलेले हजारो नागरिक गायब

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :- मालेगावमध्ये असलेल्या जन्म प्रमाणपत्र प्रकरणांमध्ये १६७३ घुसखोरी केलेले किंवा अपात्र असलेले नागरिक गायब असल्याची माहिती उपलब्ध झाली असून प्रशासन या नागरिकांचा शोध घेत आहे. मागील काही महिन्यांपासून मालेगावमध्ये बांगलादेशी घुसखोर व इतर नागरिक रहात असल्याची चर्चा सुरू होती. त्या दृष्टिकोनातून भाजपाचे ज्येष्ठ नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी याबाबत आरोपही केले होते. या आरोपांनुसार आणि त्यांनी दिलेल्या पुराव्यानुसार याबाबतचा तपास मालेगाव पोलीस करीत आहेत. तर दुसरीकडे त्यांनी उपलब्ध करून दिलेल्या माहितीनुसार तहसीलदार, अप्पर जिल्हाधिकारी आणि अतिरिक्त पोलीस अधीक्षक हे या ठिकाणी तपास करीत आहे. या प्रकरणांमध्ये प्रशासनाने कारवाई करून काही जणांना अटक केली आहे. हे सर्व करत असताना महापालिका प्रशासनाकडून देण्यात आलेल्या जन्म दाखला प्रकरणात आत्तापर्यंत मालेगाव महानगरपालिकेच्या वतीने ४ हजार २३ जन्म प्रमाणपत्र रद्द करण्यात आले असून २ हजार ३५० लोकांनी मूळ प्रमाणपत्र जमा केले आहेत. तर १६७३ लाभार्थी हे सापडत नाही, ते गायब असल्याची घटना देखील या निमित्ताने समोर आली आहे. या सर्व प्रकरणासंदर्भात चर्चा करण्यासाठी भाजपचे ज्येष्ठ नेते किरीट सोमय्या हे आज नाशिक दौऱ्यावर येणार असून सायंकाळी ते जिल्हाधिकाऱ्यांना भेटणार असल्याचे समजते.

## शहरात चार घरफोड्यांमध्ये सोन्याचांदीच्या दागिन्यांसह....

**(पान १ वरून)** :- घरफोडीचा तिसरा प्रकार सातपूर कॉलनीत घडला. फिर्यादी ऋतुजा सोमेश्वर सुराडे (रा. रतनवाडी रो-हाऊस, सातपूर कॉलनी) यांच्या घराच्या मुख्य दरवाजाचा कडीकोयंडा कशाच्या तरी सहाय्याने वाकवून घरात प्रवेश केला. घराच्या मधल्या रूममध्ये असलेले लोखंडी कपाट उघडून त्यातील ड्रॉवरमध्ये ठेवलेले २५ हजार रुपये किमतीची पाच ग्रॅम वजनाची सोन्याची कानातील कर्णफुले व वाट्या, साडेचार हजार रुपये किमतीचे चांदीचे आठ भार वजनाचे चार पैंजण असा एकूण २९ हजार ५०० रुपये किमतीचा ऐवज घरफोडी करून चोरून नेला. या प्रकरणी सातपूर पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार डिंगे करीत आहेत.

घरफोडीचा चौथा प्रकार सिडकोत घडला. फिर्यादी शशिकांत दगडू पाटील (रा. अष्टविनायक चौक, सावतानगर, सिडको) हे दि. ६ सप्टेंबर रोजी कुटुंबीयांसह बाहेरगावी गेले होते. ही संधी साधून अज्ञात चोरट्याने पाटील यांच्या घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप कशाच्या तरी सहाय्याने तोडून घरात प्रवेश केला, तसेच घराच्या हॉलमधील लोखंडी कपाटाचे दार व आतील लॉकरचा दरवाजा कशाच्या तरी सहाय्याने उचकाटून त्यात असलेल्या १५ हजार रुपये किमतीच्या तीन ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या तीन बाळ्या, १२ हजार ५०० रुपये किमतीच्या अडीच ग्रॅम वजनाच्या एक जोड सोन्याच्या बाळ्या, १२ हजार ५०० रुपये किमतीची सोन्याची कर्णफुले, १५ हजार रुपये किमतीचे तीन ग्रॅम वजनाचे सोन्याचे मणी, १० हजार रुपये किमतीची दोन ग्रॅम वजनाची सोन्याची नथ व खडा, २ हजार ५०० रुपये किमतीचे चांदीचे पायल, कडे व जोडवे असा एकूण ६७ हजार ५०० रुपये किमतीचा ऐवज अज्ञात चोरट्याने घरफोडी करून चोरून नेला. या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार देसले करीत आहेत.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक संपादक श्री. चंदुलाल शाह यांनी चैतन्य आर्ट्स, सीताराम चेंबर्स, पेठ फाटा, पंचवटी, नाशिक-३ येथे छापून भ्रमर कार्यालय, सीताराम चेंबर्स, पेठ फाटा, पंचवटी, नाशिक -३ येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी २५१४६५०, २५११७६० E-Mail-daily_bhramar@rediffmail.com नाशिकरोड संपर्क कार्यालय, बिटको क्लासिक, मुक्तिधाम समोर, नाशिकरोड, दूरध्वनी २४५६५४९. कार्यकारी संपादक- हितेश चंदुलाल शाह * पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
Printed, Published and Owned by Shri. Chandulal Shah and printed at Chaitanya Arts, Sitaram Chambers, Peth Phata, Panchavati, Nashik-3 and published at Daily Bhramar, Sitaram Chambers, Peth Phata, Panchavati, Nashik-3. * Editor : Chandulal Shah * Executive Editor : Hitesh Chandulal Shah.